**सुविचार**

यदि हर कार्य समझकर किया जाये कि भगवान मेरा साथी है तो असम्भव कार्य भी सम्भव हो जायेगा ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ मंगळवार दि. १८ जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२८ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# वायनाडमधून निवडणूक लढवणार प्रियंका गांधी

नवी दिल्ली: काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सोमवारी घोषणा केली की राहुल गांधी केरळची वायनाड लोकसभा सीट सोडून रायबरेली येथील खासदार राहतील. यासोबतच खरगे यांनी मोठी घोषणा करताना सांगितले की काँग्रेस महासचिव प्रियंका गांधी वायनाड येथून निवडणूक लढवणार.



राहुल गांधींनी लोकसभा निवडणूक २०२४मध्ये केरळच्या वायनाड आणि उत्तर प्रदेशातील रायबरेली मतदारसंघातून विजय मिळवला होता. दरम्यान, कायद्यान्वये त्यांना एक जागा सोडावी लागणार होती. याबाबत सोमवारी मल्लिकार्जुन खरगे यांनी पत्रकार परिषद घेतली. या दरम्यान ते म्हणाले की राहुल गांधी केरळच्या वायनाड मतदारसंघातून राजीनामा देतील.

मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, आजच्या बैठकीत हे ठरले की केरळच्या वायनाड मतदारसंघातून आता प्रियंका गांधी वायनाड मतदारसंघातून निवडणूक लढवतील. रायबरेलीच्या जागेशी गांधी कुटुंबाचा अतिशय जवळचा संबंध आहे. रायबरेलीच्या लोकांचे आणि पक्षाचे म्हणणे आहे की राहुल गांधी रायबरेली मतदारसंघातून खासदार रहावेत.

वायनाड मतदारसंघातून राहुल गांधींना प्रेम मिळाले आहे. मात्र कायदा याला परवानगी देत नाही. यामुळे वायनाड मतदारसंघातून त्यांना राजीनामा द्यावा लागेल. ते रायबरेलीतून खासदार असतील.

## राज्यात मान्सूनचा वेग मंदावला

मुंबई: गेल्या काही दिवसांपासून राज्यात मान्सूनचा वेग मंदावला आहे. राज्यात अनेक ठिकाणी ढगाळ वातावरण तसेच उन्हाचा कडाका बसत आहे. मान्सूनचा वेग मंदावल्याने शेतकऱ्यांची चिंता मात्र वाढली आहे.

मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाच्या तुरळक सरी कोसळल्या मात्र विदर्भात पुरेसा पाऊस झालेला नाही. दरम्यान, पावसाचा वेग वाढण्यासाठी आणखी दोन ते तीन दिवस लागण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा येथे पावसाच्या तुरळक सरी कोसळत आहेत. मात्र यांचा जोर तितका नाही. दरम्यान, पावसाची प्रगती **(पान २ वर)**

# राज्य भाजपात होणार संघटनात्मक फेरबदल

## दिल्लीत पार पडणार महाराष्ट्रातील बड्या नेत्यांची बैठक


मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या निकालात महाराष्ट्रात भाजपाचे मिशन ४५ प्लसचे स्वप्न भंगले. महायुतीला अवघ्या १७ जागांवर यश मिळाले. त्यात भाजपाला २३ जागांवरून आता अवघ्या ९ जागांवर विजय मिळाला. राज्यातील निकालात महायुतीला बसलेला फटका आणि निकालाचा आढावा घेण्यासाठी दिल्लीत राज्यातील भाजपा नेत्यांची महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. या बैठकीत लोकसभा निकाल आणि विधानसभा निवडणुकीची तयारी यावर चर्चा होणार आहे.



भाजपातील केंद्रीय नेतृत्वासोबत ही बैठक पार पडणार आहे. त्यात देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याबाबत घेतलेल्या भूमिकेवरही चर्चा होईल. महाराष्ट्रातील भाजपाचे नेते उद्या दिल्लीला जातील. त्याठिकाणी गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वात बैठक होईल. नुकतेच महाराष्ट्रातील पराभवाची जबाबदारी स्वीकारत फडणवीसांनी राज्याचे उपमुख्यमंत्रिपद सोडण्याची तयारी दर्शवली त्याचसोबत मला सरकारमधून मुक्त करावे, अशी मागणी वरिष्ठांकडे केली. फडणवीसांच्या या निर्णयावर भाजपा नेतृत्व मंगळवारी (दि. १८ जुन) विचारमंथन करेल. या बैठकीला देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, अशोक चव्हाण, गिरीश महाजन, सुधीर मुनगंटीवार यांच्यासह इतर नेते उपस्थित राहतील.

राज्यातील जनतेची दिशाभूल करण्यात विरोधकांना यश आले, संविधान बदलले जाणार ,असा खोटा प्रचार विरोधकांनी केला. पहिल्या तीन टप्प्यात हा प्रचार अधिक झाला, त्यामुळे या टप्प्यातील २४ जागांपैकी केवळ ४ जागाच आम्हाला जिंकता आल्या. मात्र उर्वरित टप्प्यात विरोधकांच्या या खोट्या नॅरेटिव्हला रोखण्यात महायुतीला यश आले. त्यामुळे त्यानंतरच्या २४ जागांपैकी १३ जागांवर महायुती विजयी झाली असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावा केला आहे.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीनंतर आता भाजपाने आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. या वर्षी चार राज्यांमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे. यात महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड आणि जम्मू-काश्मीरचा समावेश आहे. **(पान २ वर)**




**औसा येथील हिरेमठ संस्थानच्या सभामंडपात इशात ओमप्रकाश मोतीपवळे यांनी घेतला जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामिजी यांचा आर्शिवाद घेतला. याप्रसंगी श्री. गहिनीनाथ महाराज, शिवाचार्य श्री. निरंजन स्वामी, व प्रा. अॅड. बी. व्ही. मोतीपवळे.**

# पुण्याच्या जागांवरुन मविआ आघाडीत होणार बिघाडी

पुणे : लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने ३० जागा जिंकत महाराष्ट्रात चांगली कामगिरी केली. परंतु हीच आघाडी विधानसभेतही एकनिष्ठ राहणार का, असा सवाल मविआची सद्यपरिस्थिती पाहता उपस्थित होत आहे. मविआच्या नेत्यांनी ही निवडणूक एकत्रच लढवणार असल्याचे सांगितले असले तरी अंतर्गत वाद मात्र चव्हाट्यावर आल्यावाचून राहत नाहीत. त्यातच आता पुण्याच्या जागांवरुन ठाकरे गटात व राष्ट्रवादी शरद पवार गटात नवा वाद रंगण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. कारण दोन्ही पक्षांकडून पुण्याच्या



मतदारसंघांवर दावा ठोकण्यात आला आहे.

पुणे शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या पुणे शहर कार्यकारिणीची बैठक संपन्न झाली व या बैठकीनंतर पुणे शहरातील ८ पैकी ६ विधानसभा मतदारसंघात शरदचंद्र पवार पक्षाचा उमेदवार हवा असा अहवाल वरिष्ठांना पाठवण्यात आला. पुण्यातील आठही मतदारसंघांचा आढावा घेतल्यानंतर हडपसर, वडगाव शेरी, खडकवासला, शिवाजीनगर, पर्वती, पुणे कँटोन्मेंट या सहा मतदारसंघांत शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार मोठ्या फरकाने निवडून येणार हा विश्वास सर्वानुमते व्यक्त करण्यात आला.

तर दुसरीकडे उद्धव ठाकरे गटानेही पुण्यातील सहा मतदारसंघावर दावा केला आहे. कोथरूड, पर्वती, वडगाव शेरी, हडपसर, पुणे कॅन्टोन्मेंट आणि कसबा **(पान २ वर)**

# नवनीत राणा यांचे मानसिक संतुलन बिघडले : बच्चू कडू

कराड : नवनीत राणा सतत टी. व्ही. वर दिसायच्या त्यामुळे राणा जरा दबुन गेला होता. त्यांच्या घरात अंतर्गत कलह आहे. त्यामुळे स्वाभिमान पार्टीनेच भाजपाच्या नवनीत राणाला पाडले आहे. पण पराभवानंतर त्यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे, पराभव त्यांना पचवता येत नाही. आता मलाच त्यांच्याकडे डॉक्टरांना पाठवावे लागेल अशी बोचरी टीका प्रहार जनशक्तीचे नेते आमदार बच्चू कडू यांनी केली.

कराड येथे सोमवारी आमदार बच्चू कडू यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी प्रहार जनशक्तीचे मनोज माळी व त्यांचे सहकारी उपस्थित होते. आमदार बच्चू कडू म्हणाले, गेल्यावेळी नवनीत राणा निवडून आल्या राष्ट्रवादीच्या पाठींब्यावर आणि नंतर मोदी यांच्याजवळ गेल्या. आतासुद्धा भाजपाचे राज्यात सरकार नाही आले तर स्वाभिमान पार्टी पुन्हा आघाडीबरोबर जाऊन बसेल.

बायको भाजपात आणि हे स्वाभिमानमध्ये त्यामुळे लोकांमध्ये संभ्रम झाला. त्याचा फटका त्यांना बसला आहे. तुम्ही **(पान ७ वर)**



# चारशे पार च्या घोषणेमुळे कार्यकर्ते रिलॅक्स मात्र आता गाफील राहू नका: शिंदे

मुंबई : लोकसभा निवडणुकीत महायुतीला महाराष्ट्रात काही प्रमाणात फटका बसला. याची आता विधानसभेत पुनरावृत्ती होऊ नये यासाठी महायुतीकडून पुर्पूर काळजी घेतली जात आहे. तसेच विधानसभेत जास्तीत जास्त जागा मिळवण्याच्या दृष्टीने रणनिती आखली जात आहे. याच पार्श्र्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या महायुतीच्या विजयसंकल्प मेळाव्यात कार्यकर्त्यांना संबोधन केले. भाजपच्या चारसो पार च्या नाऱ्यामुळे लोकसभा निवडणुकीत फटका बसल्याची स्पष्ट कबुली एकनाथ शिंदे यांनी दिली. तसेच विधानसभेत मात्र आता अशा प्रकारे गाफील राहायचं नाही, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी कार्यकर्त्यांना दिली.

मुख्यमंत्री म्हणाले, तुम्ही गाफील राहू नका. आपण सर्व कार्यकर्ते आहात, एक-एक मत आपल्यासाठी महत्त्वाचं आहे. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत माझ्या एका मताने काय होणार, आपण जिंकणारच आहोत, असा विचार करुन गाफील राहता कामा नये. आम्ही पंतप्रधान मोदीजींसोबत ४०० पारच्या घोषणेबाबत बोललो. या घोषणेमुळे कार्यकर्ते रिलॅक्स झाले, असे मी त्यांना सांगितले. पण आता तसं करायचं नाही. आपले मोदीजी पंतप्रधानपदी बसलेले आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत कोणी कितीही जंग जंग पछाडले तरी मोदीजी त्यांच्यावर भारी पडतील, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

नुकत्याच लोकसभा निवडणुका पार पडल्या त्यात आपण जिंकलो आहे. कोकण पदवीधर मतदारसंघात निरंजन डावखरे यांना चिंता नाही, विजय आपलाच आहे. महायुती म्हणून आपण ही निवडणूक मनावर घेतली आहे. लोकसभा निवडणुकीत कोकण हा महायुतीचा बालेकिल्ला ठरलेला आहे, भिवंडी अपवाद ठरला. लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी फेक नरेटिव्ह लोकांपर्यंत पोहोचवले, त्यामध्ये ते यशस्वी ठरले. फेक नरेटिव्ह पसरवण्यात काही स्वयंसेवी संस्थांचाही हात होता. सगळ्याच स्वयंसेवी संस्था वाईट नाहीत. पण काही स्वयंसेवी संस्थांमध्ये शहरी नक्षली घुसले आहेत. हे सर्वजण मोदी द्वेषाने पछाडलेले आहेत. या एनजीओंनी देखील मोदी हटावचा नारा दिला होता, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली.

**(पान २ वर)**

## परभणी शहरात बनावट नोटा बनविणाऱ्या दोघांना अटक

परभणी : भारतीय चलनातील बनावट नोटा बनविण्याच्या साहित्यासह दोघांना दि. १५ सायंकाळी ७ च्या सुमारास पोलिसांनी अटक केली. आरोपींजवळून बनावट नोटा, प्रिंटर, नोटा तयार करण्यासाठी लागणारे साहित्य असा एकूण १५ हजार ७४० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, नवा मोंढा पोलिसांनी दोन संशयीतांना ताब्यात घेतले होते. संबंधित दोघेजण स्टेशन रोडवरील शाही मस्जिद जवळ किरायाच्या खोलीमध्ये राहत होते. त्यांच्याजवळ लॅपटॉप, मोबाईल होता. लॅपटॉपमध्ये भारतीय चलनातील २०० रुपये किंमतीचे **(पान २ वर)**



**चाकूर येथे नुतन खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांचे स्वागत करताना श्री. मोहनराव पाटील बाजूस श्री. विनायकराव पाटील, श्री. शिवप्रसाद शेटे व इतर.**



# नूतन खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांचे निलंग्यात महाविकास आघाडीकडून जंगी स्वागत

लातूर (प्रतिनिधी): नूतन खासदार डॉ शिवाजीराव काळगे हे निवडून आल्यानंतर पहिल्यांदाच निलंग्यात आल्याने त्यांचे महाविकास आघाडीच्या वतीने फटाक्यांची आतषबाजी करत जंगी स्वागत करण्यात आले . तदनंतर शासकीय विश्रामग्रह येथे त्यांचा सत्कार करण्यात आला.

खासदार डॉ शिवाजीराव काळगे हे निलंगा दौऱ्यावर आल्यानंतर महविकास आघाडीच्या वतीने त्यांचे छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्यांची आतषबाजी करत जंगी स्वागत करण्यात आले .तदनंतर खासदार डॉ शिवाजीराव काळगे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास , कर्मयोगी डॉ शिवाजीराव पाटील निलंगेकर व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. यानंतरी शासकीय विश्रामग्रह येथे महाविकास आघाडीच्या वतीने खा.डॉ.काळगे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर , काँग्रेसचे प्रदेश सचिव अभय साळुंके , जिल्हा अध्यक्ष श्रीशैल उटगे , युवक काँग्रेस लातूर शहर अध्यक्ष इम्रान सय्यद , सोशल मीडिया लातूर जिल्हाध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी , अल्पसंख्यांक सेलचे प्रदेश उपाध्यक्ष हमीद शेख , माजी सभापती अजित माने निलंगा तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील , जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर पाटील , काँग्रेस अल्पसंख्यांक सेलचे तालुका अध्यक्ष लाला पटेल , शिवसेना तालुका प्रमुख अविनाश रेशमे , काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष नारायण सोमवंशी , सरपंच संघाचे जिल्हा अध्यक्ष पंकज शेळके निलंगा शहर अध्यक्ष अजित नाईकवाडे , युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्ष अमोल सोनकांबळे , काँग्रेसचे युवक तालुका अध्यक्ष मदन बिरादार , युवक शहर अध्यक्ष मुजीब सौदागर , **(पान २ वर)**

# पश्चिम बंगालमध्ये मालगाडी आणि एक्सप्रेस रेल्वेची भीषण धडक!




कोलकाता : पश्चिम बंगालमध्ये रेल्वे अपघाताची एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. कंचनजंगा एक्सप्रेस आणि मालगाडीची जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती, की एक्सप्रेस गाडी रुळावरून घसरली. यामुळे रेल्वेच्या मागील बाजूच्या तीन बोगींचे मोठे नुकसान झाले आहे. या अपघातात आतापर्यंत ४ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. रंगपनीर स्टेशनजवळ हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. घटनास्थळी बचावकार्य सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सियालवाहकडे जाताना कंचनजंगा एक्स्प्रेसचा भीषण अपघात झाला. या अपघातात आतापर्यंत चार जणांचा मृत्यू झाला असून, अनेक प्रवासी जखमी आहेत. त्यांना जवळच्या रुग्णालयात हलवण्यात येत आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. बचाव पथक, वैद्यकीय मदतीसाठी डॉक्टरांची टीम, रुग्णवाहिका, पोलीस आणि आपत्ती पथके घटनास्थळी रवाना झाली आहेत. दरम्यान, या अपघाताची माहिती मिळताच, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शोक व्यक्त केला आहे. **(पान २ वर)**




# क्रिडा संकुल विकासासाठी अडीच कोटींचा निधी मिळवून दिल्याबद्दल आ. कराड यांचे रेणापूरकरांनी मानले आभार

लातूर / प्रतिनिधी- - रेणापूर येथील तालुका क्रीडा संकुलाच्या विविध विकास कामासाठी राज्यातील महायुती शासनाच्या क्रीडा विभागाकडून २ कोटी ४५ लक्ष रुपयाचा निधी मिळवून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे रेणापूर शहर भाजपाच्या वतीने यशाचित सत्कार करुन आभार व्यक्त केले.

रेणापूर येथील तालुका क्रीडा संकुल विकसित व्हावे, खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे यासाठी भाजपाचे नेते तथा रेणापूर क्रीडा संकुलाचे अध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि राज्याचे युवक व क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे २ कोटी ४५ लक्ष ३७ हजार रुपयाचा निधी राज्याच्या क्रीडा विभागाने नुकताच मंजूर केला आहे. मागील काळात या क्रीडा संकुलाच्या मैदान विकासासाठी शासनाकडून ९३ लक्ष रुपयाची मंजुरी मिळाली होती. सदर रकमेतून क्रिडा संकूलाचे काही कामांना गती मिळाली असून प्रगतीपथावर आहेत. नव्याने मंजूर झालेल्या २ कोटी ४५ लक्ष रुपये निधीतून बॅडमिंटन हॉल, २०० मीटर धावनपथ, हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो मैदान विकसित करण्याबरोबरच ऑफिस, स्टोर रूम आदी कामे प्रस्तावित केली आहेत.

रेणापूर तालुका क्रीडा संकुलनासाठी मागील काळात ९३ लक्ष रुपये आणि नव्याने २ कोटी ४५ लक्ष ३७ हजार मंजूर झाल्याने एकूण ३ कोटी ३८ लक्ष रुपयाचा निधीतून क्रिडा संकूलनाच्या विविध विकास कामे होणार आहेत. खेळाच्या **(पान २ वर)**

# महेश नवमीनिमित्त शहरात समाजबांधवांचा उसळला जनसागर

## अद्भुतपूर्व शोभायात्रेने लातूरकरांचे लक्ष वेधले



लातूर / प्रतिनिधी: - प्रतिष्ठित आणि शांत समाज म्हणून माहेश्वरी समाजाला ओळखला जातो. लातूर जिल्हा माहेश्वरी सभेच्या वतीने शनिवार , दि. १५ जून रोजी महेश नवमी विविध कार्यक्रमांनी शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात थाटामाटात साजरी करण्यात आली. मार्केट यार्डातील गौरीशंकर मंदिर ते बालाजी मंदिर काढण्यात आलेल्या अभूतपूर्व आणि भव्य शोभायात्रेने लातूरकर मंत्रमुग्ध झाल्याचे पहावयास मिळाले. वैशिष्ट्यपूर्ण देखाव्याने लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले.यावेळी शहरात माहेश्वरी समाजबांधवांचा जनसागर उसळल्याचे चित्र पहावयास मिळाले.

लातूर शहरात प्रतिवर्षी महेश नवमी मोठ्या उत्साहात साजरी होत असते. यावर्षीही शहरात लातूर जिल्हा आणि शहर माहेश्वरी सभेच्या वतीने महेश नवमी निमित्ताने शहरात भव्य अशी श्री भगवान महेश यांची शोभायात्रा काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड परिसरातील गौरीशंकर येथून निघालेली शोभायात्रा हनुमान चौक - गंजगोलाई -सुभाष - चौक- खडक हनुमान पापविनाश रोड वरून बालाजी मंदीर येथे विसर्जित झाली. या शोभायात्रेत माहेश्वरी ढोलताशा पथक, झ्याकिया सादर करण्यात आल्या. यावेळी लातूर जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष सी.ए. प्रकाश कासट, सचिव फुलचंद काबरा, कोषाध्यक्ष जगदीश भुतडा, संघटनमंत्री विजयकुमार चांडक, महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा उपाध्यक्ष राजकुमार पल्लोड, माहेश्वरी समाज, आखिल भारतीय सदस्य हुकमचंद कलंत्री, बालकिशनजी मुंदडा,

उपाध्यक्ष ओमप्रकाश सारडा, जयप्रकाश खटोड, मधुसूदन सोनी, दीपक भुतडा, प्रदेश कार्य समिती सदस्य राजेश मंत्री, संयुक्त मंत्री गोकुळदास चांडक, राजगोपाल बाहेती, महेश आवास प्रमुख गोविंद कोठारी, सह संघटन मंत्री पुरुषोत्तम कालिया, रामनिवास धुत, महेश सेना अध्यक्ष संतोष तोष्णीवाल, सांस्कृतिक क्रीडा प्रमुख अजय तापडीया, कार्यालय मंत्री चांदकरण लड्ढा, आयटी सेल अशोक जाजू, मीडिया व प्रचार मंत्री श्याम भट्टड, सह कोषाध्यक्ष प्रल्हाद चांडक, प्रदेश कार्यकारिणी सदस्य ईश्वर बाहेती, रामेश्वर गिल्डा, गगन मालपाणी, दिलीप सोमाणी, नंदकिशोर सोनी, रामेश्वर भराडीया, श्यामसुंदर सोनी, बजरंग पल्लोड, भारतलाल धुत आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी समाजातील महिला मोठया संख्येने सहभागी झाल्या होत्या. शोभायात्रा बालाजी मंदिर येथे आली असता भगवान महेश आरती झाली. त्यानंतर तिकीटधारकांमधून लक्की ड्रॉ काढण्यात येऊन विजेत्यास बक्षीस देण्यात आले. याप्रसंगी

माहेश्वरी समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवट धूत परिवाराच्या वतीने आयोजित स्नेहभोजनाने झाली.

शोभायात्रेत हजारो माहेश्वरी समाजबांधव उपस्थित होते. कोणतीही गैरसोय होऊ नये याची काळजी घेण्यात आली होती, .शोभायात्रेच्या मार्गावर अनेक ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते जिल्हा माहेश्वरी सभेजेचे अध्यक्ष व पदी पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले, सत्कार करण्यात आले, बऱ्याच जागी माहेश्वरी बांधवांनी व व्यापाऱ्यांनी, पिण्याचे पाणी, थंड पेय, लस्सी , कुल्फी, सुक्का मेवा आईस्क्रीम , चॉकलेट ,आदींची व्यवस्था केली होती.

### पर्यावरणाविषयी जनजागृती, व संस्कृतीचे सादरीकरण

तसेच यावेळी पारंपरिक बैलगाडीच्या माध्यमातून संदेश फलकातून जनजागृती करण्यात आली. त्यामध्ये हर छोटा बदलाव बडी कामयाबी का हिस्सा होता है!, जल रहेगा तभी तो अपना कल रहेगा, जल है तो जीवन है, ग्लोबल वॉर्मिंग को रोके, प्रकृती को बाचाए, प्रकृती की सुरक्षा मानवता की सुरक्षा, प्लास्टिक समंदर का हत्यारा, पेड लगाओ, पेड बचाओ या सारखे अप्रतिम व आपल्या संस्कृतीचे महत्त्व वाढवणारे व संस्कृती घडवणारे पर्यावरणाविषयी जनजागृती करणारे देखाव्याची सादरीकरण करण्यात आले होते.

महेश नवमी निमित्ताने आयोजित भव्य आणि अभूतपूर्व अशा शोभायात्रेत सहभागी होण्याचे आवाहन माहेश्वरी समाजबांधवांना करण्यात आले होते. या आवाहनास उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन हजारोंच्या संख्येने उपस्थित राहिल्याने आपल्या समाजाचे संघटन दिसून आले आहे. संघटन मजबूत असले तर सर्व शक्य आहे आहे. हा सोहळा यशस्वी करण्यामागे सर्वांचे मोठे योगदान आहे.

**- सीए प्रकाशजी कासट, अध्यक्ष**
लातूर जिल्हा माहेश्वरी सभा

### वैशिष्ट्यपूर्ण देखाव्याने व कला नृत्याने लातूरकरांचे लक्ष घेतले वेधून

शोभा यात्रेदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज, झाशीची राणी लक्ष्मीबाई, महाराणा प्रताप,पेशवा , अशा अनेक महापुरुषांची वेशभूषा परिधान करून घोडे स्वारानी लक्ष वेधले. त्याचबरोबर ढोल-ताशाच्या कलापथकाने विविध कलाप्रकार सादर केले. आषाढी एकादशीचे औचित्य साधून पारंपरिक वारकरी टाळ-मृदंगाचा गजरही पहावयास मिळाला. यावेळी चौका चौकात राजस्थान, केरळ , हरियाणा येथून आलेल्या पथकांनी तेथील संस्कृतीचे सादरीकरण केले. यासोबतच महाबली हनुमान, शिवतांडव यांच्या सादरीकरणाने लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले.

# चाकरवाडीत राम सीता स्वयंवराचा दैदिप्यमान सोहळा संपन्न

## समाधान महाराजांच्या कथेत भक्ती उत्साहाचे उधाण

लातूर / प्रतिनिधी- असो ऐसा कोठे आठव्ची नाही देहीच विधेही भोगू दशा अशा तल्लीनतेने व प्रचंड भक्ती उत्साहाने श्री समाधान महाराज शर्मा यांच्या कथेतील आज प्रभू राम सीता स्वयंवर सोहळ्यात प्रचंड माऊली भक्त देहभान विसरून नाम घोष करीत तल्लीन होऊन नाचले आणि आकाशी भिडणारा प्रभू रामाचा आणि माऊली नामाचा जयघोष मुखाने केला. अत्यंत प्रभावीपणे कथा सादरीकरण असल्याने उपस्थित हजारो भक्तांना कथेशी भजनाशी एकरूप करण्याचे कसब रामायणाचार्य श्री समाधान महाराज शर्मा यांनी आज चाकरवाडीत प्रत्ययास आणले चाकरवाडी गावात काय वाजत गाजत सोन्याचे बाशिंग लगीन देवाच लागत हे गीत म्हणत उपस्थित होते.

माऊली भक्त देहभान विसरून तर नाचलेच पण कथा मंचावर स्वयंवर सोहळा संपन्न झाल्यानंतर स्वतः श्री समाधान महाराज यांनी ह भ प श्री महादेव महाराज व ह भ प श्री नारायण महाराज भाऊ यांच्यासोबत आनंदाची फुगडी खेळून या सर्व उपस्थित भाविक भक्तांना आनंदाची मेजवानी दिली काल काल प्रभू रामाचा जन्मोत्सव झाला बाळा जो जो रे कुलभूषणा दशरथ नंदना बाळा जो जो रे असा पाळणा म्हणून जल्लोषात राम जन्म झाला आज रामकथेत वशिष्ठानकडे प्रभू रामचंद्र भरत शत्रुघ्न आणि लक्ष्मण हे गुरु उपदेश घेण्यासाठी आश्रमात जातात विश्वाचे रक्षण करणारा प्रभू यास वशिष्ठ मुनी ओळखून त्यांच्या पायाला स्पर्श करतात नंतर, सीता व रामाची बगीच्यात गुरुसाठी फुले वेचताना भेट होते आणि तदनंतर प्रभू राम स्वयंवर सोहळ्यात उपस्थित होतात अनेकांनी प्रयत्न करून जे धनुष्य उचलत नाही ते शेवटी प्रभुणे लिहल्या सहज उडून चाप ओढला आणि स्वयंवरची अट पूर्ण करून सीतामाईला वर्माला घातली ही कथा अत्यंत सुंदर समर्पक श्रवणीय अभंग गीत चौपाही या आधारे विशद केली आजचा हा विवाह सोहळा अवर्णनीय असा झाला बाहेर पाऊस सुरू असताना कोणतेही भान श्रोत्याला नव्हते इतके ते या कथेशी समरस झालेले होते हा नाम जल्लोष हे जगप्रसिद्ध असे अन्न सदावर्त आणि अनुदान हे माऊलींच्या तपस्या आणि पुण्याईचा प्रसाद आहे असे सांगून दादा माऊली ही केवळ माझी नाही तर उभ्या महाराष्ट्राची माय आहे दादांनी प्रत्येकाला जीव लावला आपलसं केलं २४ वर्षे नव्हे २४ युग लोटली तरी माऊलींचे स्मरण माऊलींचा ध्यास माऊलींची प्रेम भक्ती आठवण या तमाम जमलेल्या सहित सर्व माऊली भक्तांना जन्मोजन्मी राहील असे समाधान महाराज म्हणाले चिरंजीव आहे माऊलींची छाया समाधीत आहे पुण्यवंत काया असे वर्णन माऊलींचे करीत श्री समाधान महाराज म्हणतात आपण मुलांना संस्कार द्या त्याला परमार्थ व हिंदू धर्म याचे सर्व तत्व व संस्कार देणे अत्यंत गरजेचे आहे आपण इथे हे लक्षात ठेवा की लहान मुलांवर संस्कार केलात तर दादांना अभिप्रेत असणारा हेतू सफल होणार आहे अ म्हणजे अज्ञान पासून ज्ञ ज्ञ ज्ञानेश्वरापर्यंत पोहोचवणारी जगात एकमेव समृद्ध भाषा ती म्हणजे मराठी होय मुलांना मराठी शाळेतच घाला इंग्रजी शाळेत घालू नका त्यांच्या तोंडातून मम्मी पप्पा मॅम हे न येऊ देता आई माय बाबा हे येऊ द्या, लेकर म्हणजे छोटी मुलच देवाचा हात धरू शकतात कारण ती निष्पाप आहेत बच्चे ही भगवान होते है और वही आपको भगवान के दर्शन करते है असे समाधान महाराज म्हणतात माऊली सारखा विनम्र त्यागी परोपकारी प्रेमळ वासल्यपूर्ण वृत्तीने परमार्थ आचरण आणि संस्कार शिकवणारा साधू असेल तर कुठल्याही श्रीमंतीची गरज नाही साधू म्हणजे अवघा मृत कुंभ तो कधीही कुठेही कसाही भेटेल तर आपले सर्व जीवनच अमृतमय आणि गोड होऊन जाईल असे समाधान महाराज म्हणतात मी लहान असताना माऊलींचा हात धरून केज मध्ये माझ्या घरी न्यायचं मी किती भाग्यवान आहे की देवाचा हात धरण्याचे सौभाग्य मला लाभले आज चाकरवाडी येथे २४ व्या पुण्यस्मरण सोहळ्यात आणि प्रत्येक आमावश्याला लाखोसदभक्त श्रद्धेने येऊन माऊलींच्या समाधीवर नतमस्तक होतात त्या प्रत्येकास माऊलींची वेगवेगळी अनुभूती आहे आपण चाकरवाडीत आलात तर इथे कथा ऐका नामस्मरण करा जप करा भक्ती करा सेवा करा कीर्तनाचा भजन ऐका माऊलींचे दर्शन घ्या पण इथे येऊन गावाकडचे आणि व्यक्तिगत कुटाणे आणि चर्चा ही भास्कर असून ती बंद करा आपल्या घरातील संस्कार चांगले असतील तर मुलं देखील सद्गुणी बनतील यावर लक्ष द्या असे आवाहन केले आज पर्यंत वीस वर्ष मी दादांचे स्मरण करून भगवंताची केलेल्या सेवेचे आणि दादांच्या कृपाशीर्वादाची फळ म्हणजे ही कथा करण्याचे भाग्य मला लाभले आहे असे समाधान महाराज म्हणाले आणि दादांचे प्रसंग सांगताना अक्षरशः कथा व्यासपीठावर समाधान महाराज सद्गदित झाले तेव्हा उपस्थित माऊली फक्त यांनाही अश्रूंना वाट मोकळी करून द्यावी लागली. एकूण श्रीक्षेत्र चाकरवाडीत सीता स्वयंवर प्रभू रामचंद्र व सीता यांच्या स्वयंवराचा हा सोहळा अत्यंत अविस्मरणीय व अलौकिक असा झाला कथा सभागृहातील प्रत्येक जण नामस्मरणावेळी हाताने टाळी मुखाने रामनाम आणि माऊली नामघोष करीत असलेला होता ही कथेशी एकरूप करून घेऊन माऊलीच्या भक्तीरसात चिंब केले . पुण्यस्मरण सोहळ्याच्या तिसऱ्या दिवशी माऊलींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दी वाढलेली आहे.

**- (श्याम कुलकर्णी )**

# नूतन खा. डॉ. काळगे यांची सदिच्छा भेट



शिरूरआनंतपाळ : लातुर जिल्हा नूतन खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांनी शनिवारी शहरातील शिक्षक पतसंस्था येथे सदिच्छा भेट दिली आसता पतसंस्थेच्या वतीने चेअरमन गोविंद हंद्राळे यांच्या हस्ते त्यांचा शालश्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला . या प्रसंगी शैलेश उटगे श्री आबासाहेब पाटिल श्री अरविंद भातांब्रे यांचा सत्कार करण्यात आला .

व्हाईस चेअरमन अर्जुनराव शिंदे संचालक श्री एम टी सुर्यवंशी , केंद्रिय मुख्याध्यापक श्री बालाजीराव जाधव श्री गुंडेराव आवाळे श्री अनिल तोंडारे श्री देवीदास सांगवे श्री मुरहारी कमठाणे श्री मारोती शिवणे श्री दिलीप देवशेट्टे श्री उत्तम कलबुर्गे श्री गुरुबस सुगावे इ शिक्षक उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री एम टी सुर्यवंशी सरांनी केले . आभार श्री बालाजी जाधव सरांनी मानले . कार्यक्रमाचे सुंदर नियोजन श्रीमती ज्योती एरंडे मॅडम व श्री सुमित लामतुरे यांनी केले .

## पितृ दिन (फादर्स डे)

जून महिन्यातील तिसरा रविवार हा पितृ दिन (फादर्स डे) म्हणून साजरा केला जातो. वडिलांचा गौरव करण्याचा आजचा हा दिवस. गेल्या काही वर्षा मध्ये विविध डेज साजरा करण्याचा ट्रेंड चांगलाच रुजू झाला आहे. त्यातीलच एक दिवस म्हणजे फादर्स डे. आपल्या आयुष्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावणाऱ्या वडिलांप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस. मुळात बाबा, वडील या शब्दा ऐवजी फादर वगैरे म्हणायला आपली जीभ लवकर तयार होत नाही. प्रत्येकाच्या जीवनात आई इतके बाबा सुद्धा महत्त्वाचे असतात. आपल्या घरच्यांसाठी, आपल्या मुलांसाठी आपण काहीतरी करतोय याची पुसटशी जाणीवही बाबा त्यांच्या चेहऱ्यावर कधी येऊ देतं नाहीत. घरामध्ये शिस्त टिकवण्यासाठी प्रसंगी बाबा कठोर होतात पण त्यांच्याशी असलेलं नातं हे मैत्रीच्या नात्यासारखं आहे. पितृछत्र हे आकाशासारखे, समुद्रा सारखे विशाल, अथांग आहे. सार्यांना सामावून घेण्याची ताकद त्यात सामावलेली आहे. लाडात वाढलेली लेक, दुसर्याच्या हातात सोपवताना माझ्या काळजाच्या तुकड्याला सुखी ठेवा असं बाप अतिवेदनेने न बोलताच डोळ्यांनी बोलून जातो. आई सारखे घाय मोकलून रडण्याचे स्वातंत्र्यही त्याला नाही. कारण, सर्वांचं सांत्वन त्यालाच करायचं असतं. कितीही गरीब, श्रीमंत वडील असो, तो आपल्या कमाईतला जास्त हिस्सा पत्नी, मुले, कुटुंब यांच्यावरच खर्च करतो. मला जे मिळालं नाही, त्यापेक्षा कितीतरी भरभरून परिवारातील सदस्यांना मिळावं या करिता अहोरात्र त्याची धडपड चाललेली असते. केवळ झिजत राहणं, हेच त्याचं ब्रीद असावं का? आजच्या फादर्स डे च्या सर्व वडीलांना शुभेच्छा !

**- संजीव वेलणकर पुणे.**

## पान १ वरून

### राज्यात....

मंदावल्याने काही ठिकाणी उन्हाचे पुन्हा चटके बसू लागते. अनेक ठिकाणी तर तापमान वाढून ३५ ते ४० अंशापर्यंत पोहोचले आहे.

येत्या तीन ते चार दिवसांत अरबी समुद्रात नैऋत्य मोसमी पावसाच्या शाखा मजबूत होतील आणि त्यानंतर पावसाचा जोर २० जूननंतर वाढेल असा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे.

अद्याप उन्हाचे चटके सहन करणारा विदर्भ मात्र पावसाच्या प्रतीक्षेत आहे. विदर्भात हवा तितका पाऊस झालेला नाही त्यामुळे तेथील लोक पावसाची प्रतीक्षा करत आहेत.

### राज्य भाजपात...

दरम्यान, भाजपाने या चार राज्यांसाठी नवीन निवडणूक प्रभारी आणि सह-प्रभारी नियुक्त केले आहेत. भूपेंद्र यादव यांना महाराष्ट्राचे प्रभारी बनवले आहे, तर अश्विनी वैष्णव सहप्रभारी म्हणून काम पाहतील. हरियाणामध्ये धर्मेंद्र प्रधान यांना प्रभारी बनवण्यात आले आहे, तर विपलव कुमार देव सहप्रभारी असतील. शिवराज सिंह चौहान झारखंडचे प्रभारी असतील. त्यांच्या मदतीला आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा आणि सहप्रभारी म्हून काम पाहतील. यासोबतच जी किशन रेड्डी यांना जम्मू-काश्मीरचे प्रभारी बनवण्यात आले आहे. ही नियुक्ती तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे.

झारखंड, महाराष्ट्र आणि हरियाणामध्ये ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये निवडणुका होण्याची शक्यता आहे. या तीन राज्यांच्या सद्यस्थितीबद्दल बोलायचे झाले, तर हरियाणामध्ये भाजपचे सरकार आहे. नायबसिंग सैनी हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत. लोकसभा निवडणुकीतील उत्कृष्ट कामगिरीमुळे यावेळी काँग्रेसचेही मनोबल उंचावले आहे. त्यांनी हरियाणात सरकार स्थापन करण्याचा दावा केला आहे. झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेसचे युतीचे सरकार आहे. राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री चंपाई सोरेन आहेत.

### पुण्याच्या...

या मतदारसंघावर ठाकरे गटाकडून दावा करण्यात आला आहे. यांतील चार जागांवर दोन्ही गटाने दावा ठोकला असून त्यामुळे दोघांमध्ये वाद रंगण्याची शक्यता आहे. विधानसभेच्या जागावाटपावेळी पुण्यातील या मतदारसंघावरुन तिढा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जागावाटप लांबू शकते. येत्या काळात मविआत कोण सामंजस्याची भूमिका घेणार, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### नवनीत...

कपटी आहात अशी टीका तुमच्यावर होतेय याबाबत विचारताच बच्चू कडू म्हणाले, जे नालायक आहेत त्यांच्यासाठी आम्ही कपटीचे आहोत.

### चारशे पार...

महाविकास आघाडीने जास्त जागा जिंकल्या असल्या तरी मतांची टक्केवारीतील फरक फार कमी आहे. आज मुंबईतही आपल्याला त्यांच्यापेक्षा २ लाख मतं जास्त आहेत. आज आपला स्ट्राईक रेट उबाठा पेक्षा जास्त आहे. राज्यातील मतांच्या टक्केवारीत आपण थोड्या फरकानेच मागे आहोत. लोकसभा निवडणुकीत ३० जागांवर विजय मिळाल्यानंतर आम्ही १८० जागा जिंकणार, असे मविआ म्हणत आहे. असे गणित कुठे असते का, असा सवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विचारला.

### परभणी शहरात...

फोटो, नकली नोटा कशा बनवायच्या याबाबत व्हीडीओ होते. पोलिसांनी संबंधित दोघांना नानलपेठ पोलीसांच्या स्वाधीन केले.

त्यानंतर दोन्ही आरोपींची चौकशी करत ते राहत असलेल्या ठिकाणी पोलीस गेले. या ठिकाणची तपासणी केली असता तेथे नोटा तयार करण्यासाठी लागणारे बॉन्ड पेपर, शाई, प्रिंटर, काही बनावट नोटा असे साहित्य सापडले. या प्रकरणात पोलीसांनी ताब्यात घेतलेल्या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, अप्पर पोलीस अधिक्षक यशवंत काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली.

### नूतन खासदार...

प्रा दयानंद चोपणे , युवा सेना तालुका प्रमुख प्रशांत वांजरवाडे , चक्रधर शेळके आदीसह काँग्रेस महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पश्चिम...

नेमकं काय घडलं?

पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग जिल्ह्यात सोमवारी सकाळी कंचनजंगाएक्सप्रेससियालवाहकडे जात होती. त्यावेळी पॅसेंजर रेल्वे आणि कंचनजंगा एक्स्प्रेस यांची भीषण धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की कंचनजंगा एक्स्प्रेसचे अनेक डब्बे ट्रॅकवरुन खाली घसरले. आज सकाळी साडेनऊच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

### क्रिडा संकुल...

विविध प्रकारातील खेळाडू या भागात मोठ्या प्रमाणात असतानाही क्रीडा संकुलाच्या अभावामुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. सदरील क्रिडा संकूल विकसीत होत असल्याने रेणापूर शहरासह तालुक्यातील खेळाडूंना मोठी मदत होणार आहे. रेणापूर तालुका क्रीडा संकुलाच्या विविध विकास कामासाठी राज्यातील महायुती शासनाच्या क्रीडा विभागाकडून आतापर्यंत एकूण ३ कोटी ३८ लक्ष रुपयाचा निधी मिळवून घेतल्याबद्दल भाजपाचे नेते तथा रेणापूर क्रीडा संकुलाचे अध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांचे रेणापूर शहर भाजपाच्या वतीने यथोचित सत्कार करुन आभार व्यक्त केले आहेत. यावेळी रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक अकनगिरे, शहराध्यक्ष अच्युत कातळे, दत्ता सरवदे, चंद्रकांत कातळे, दिनकर राठोड, शेख अजीम, संतोष राठोड, महेश गाडे, उत्तम चव्हाण, उत्तम घोडके, उज्वल कांबळे, अंतराम चव्हाण, जगन्नाथ कातळे, गणेश चव्हाण, गणेश माळेगावकर, लखन आवळे, हणमंत भालेराव, संजय म्हेत्रे यांच्यासह अनेकजण होते.

## ।। आनंदी पहाट ।।

कृतज्ञता
वडिलांविषयी
आज जागतिक पितृदिन
पिता स्वर्गः पिता धर्मः
पिता परमकं तपः ।
पितरि प्रीतिमापन्ने सर्वाः
प्रीयन्ति देवताः ।।
माझे वडिल
माझ्यासाठी स्वर्ग
आहेत. माझ्या
वडिलांचे संस्कार,
आज्ञापालन हाच माझा
धर्म आहे. त्यांना सुखी
ठेवणे हीच माझ्या
जीवनाची तपस्या आहे.
माझे वडिल जेव्हा
आनंदी होतात तेव्हा
सगळ्या देवताही आनंदी
होतात.
भारतीय संस्कृतीत
पित्याचा देव म्हणून
सन्मान होतो. वडिल
म्हणजे आमचे जगातील
सर्वात मोठे आदरस्थान.
त्यांच्यामुळेच जगातील
आमची ओळख असते.
त्यांच्या छत्रछायेखाली
आम्ही निर्धास्त जीवन
जगतो.
या जगात आमचे
अस्तित्व ओळख आहे
ती वडीलांमुळेच.
वडिल म्हणजे
आभाळमाया. त्यांच्या
मायेची जागा इतर
कुणीही घेवूच शकत
नाही. ते कुटुंबाच्या
उदरनिर्वाहासाठी जन्मभर
अपार कष्ट.. संघर्ष
करतात. यावेळी त्यांना
जगाचे कडू गोड अनुभव
येतात. पण वाईट
अनुभवाची जाणीव
कधी कुटुंबाला करुन
देत नाहीत. जन्मभर
कुटुंबासाठी त्याग हेच
त्यांचे जीवन उद्दिष्ट
असते. वडील अशी
अदृश्य छत्रछाया की
जिच्या छायेत आम्ही
आजन्म सुरक्षित असतो.
वडिल आपल्या भावना
उघडपणे प्रकट करत
नाही. ना आनंद ना
आनंद. हे आगळे
सामर्थ्य त्यांच्याकडे
असते. मुलींवर तर
वडिलांचे विशेष प्रेम
असते. याचे कारण ही
लाडकी लेक एकदिवस
परक्या घरी जाणार याची
त्यांना जाणीव असते.
मुलीचे लग्न हा
वडिलासाठी जीवनातला
मोठा आनंद क्षण.
पण मुलीवर मायाही
तेवढीच केलेली असते.
तिचे सासरी जाणे
आनंदी असले तरीही
पाठवणीवेळी दुःखाचा
बांध तुटतोच. आई रडून
भावनांना वाट मोकळी
करुन देते. वडिलांना ते
शक्य नसते. वडिलांच्या
याच भावना व्यक्त
करणारे हे गीत.
आज पितृदिन. वडिलांनी
आमच्यासाठी केलेल्या
कष्टाची आम्हांला
जाणीव आहे. सदैव
कृतज्ञभाव आहे. या
विशाल जगात समर्थपणे
जगण्यासाठी पायावर
उभे करणाऱ्या वडिलांना
साष्टांग दंडवत.

दाटून कंठ येतो,
ओठांत येई गाणे
जा आपुल्या घरी तू,
जा लाडके सुखाने
हातात बाळपोथी,
ओठांत बाळभाषा
रमलो तुझ्यासवे मी
गिरिवत श्रीगणेशा,
वळवून अक्षरांना
केले तुला शहाणे,
जातो सुखावुनि मी,
या गोड आठवाने
बोलात बोबडीच्या
संगीत जागविले
लय ताल सूर लेणे,
सहजीच लेवविले
एकेक सूर यावा,
न्हाऊन अमृताने,
अवघ्याच जीवनाचे,
व्हावे सुरेल गाणे
घेऊ कसा निरोप,
तुटतात आत धागे
हा देह दूर जाता,
मन राहणार मागे
धन आत्मजा दुजाचे,
ज्याचे तयास देणे
परक्या परी आता मी,
येथे फिरुनी येणे
*******
**सौजन्य - सौ. शीला राजेंद्र लटंगे, डिकसळ.**

# चाकूर वि.वि.का.सोसायटि दर्जेदार बियाणे व खते देण्यात अव्वल

चाकूर प्रतिनिधी : चाकूर येथील वि.वि.का.से.स.संस्था म. तालुका - चाकूर या शेतकऱ्यांच्या सोसायटि कडून शेतकऱ्यांसाठी दर्जेदार बियाणे व नामांकित कंपनीचे खते दिले जात असल्यामुळे ग्राहक शेतकऱ्यांकडून खरेदीसाठी मोठा प्रतिसाद मिळत आसल्याचे चेअरमन माकणे यांनी सांगीतले.

सध्या बाजारामध्ये बोगस खतांचा सुळसुळाट होत असल्यामुळे सभासद शेतकऱ्यांतून खते व बी बियाणे बाजारातिल इतर दुकानांतून खरेदि घेण्यासाठी चलबिचल होत असल्यामुळे सोसायटीमधून खात्रीचे व विश्र्वसनीय खते व बियाणे मिळते अशी भावना ठेवून खते व दर्जेदार बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकरी सभासद व इतर ग्राहकांचा मोठा प्रतिसाद सोसायटीमधे पाहायला मिळत आहे. वि.वि. का.से.स.संस्था म.चाकूर ही सोसायटी सहकार विभागामध्ये नामांकित झाली असल्यामुळे या सोसायटीचे नाव कायम विश्र्वसनीय ठेवण्यासाठी सर्व शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे व नामांकित कंपनीचे खते पूरविले जात असल्यामुळे व आपल्या सोसायटीचे प्रशंसनीय कार्य म्हणजेच प्रत्येक दिपावलीसाठी प्रत्येक सभासदाला पन्नास किलो साखर, लाभांशाचे वाटप असो व कर्जाचा भरना असो, किंवा शेतकरी पतसंस्थेद्वारे सर्वसामान्यांना कर्ज पुरवठा असो, इतर सभासदांच्या बाबतीत सोसायटी कडून केलेली मदत असो असे महत्वाचे कार्य असल्यामुळे सोसायटीच्या सभासद शेतकऱ्यांची व इतरही शेतकऱ्याचे हित आपणच जोपासले पाहिजेत असेही या सोसायटीचे चेअरमन गोविंदराव माकणे यांनी सांगितले आहे.

# यशवंत धाराशिव जिल्हा

मंगळवार दि. १८ जून २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com


## परंडा शहरासह तालुक्यात बकरी ईद उत्साहात




परंडा दि.१७ ( प्रतिनिधी ) – परंडा शहरासह तालुक्यात बकरी ईद दि.१७ जून रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरात चार ठिकाणी बकरी ईदची नमाज अदा करण्यात आली. ईदगा मैदानावर शहर काझी जफरअली मौलाना यांच्या नेतृत्वाखाली मुस्लिम बांधवांनी नमाज अदा केली. नमाज अदा झाल्यानंतर काझी यांनी बकरी ईदचे महत्व सांगितले. परंडा शहरात बकरी ईद या मुस्लिम बांधवांच्या सणानिमित्त मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेटी देवून बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या. शहरात ईदची नमाज ईदगा मैदानावर, ख्वॉजा बद्रोद्दिन दर्गाह, पल्ला गल्लीतील मस्जिद व मर्कस मस्जिद या ठीकाणी मुस्लिम बांधवांनी नमाज अदा केली.

# पंढरीच्या वारीची भव्यता, सार्वजनिक आरोग्य विभागाची सज्जता



## आरोग्याची वारी पंढरीच्या दारी



धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – आषाढी एकादशीला विठ्ठलाच्या भेटीसाठी राज्यात पालखी सोहळा सुरु झाला असून, दि.१३ जूनला श्री संत गजानन महाराज मंदिर श्रीच्या पालखीने शेगाव, बुलढाणा जिल्ह्यातून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान ठेवले आहे. 'आरोग्याची वारी – पंढरीच्या दारी' माध्यमातून संपूर्ण पालखी मार्गावर दि.१४ जूनपर्यंत एकूण १,७४३ वारकऱ्यांना आरोग्य विभागामार्फत मोफत आरोग्य सेवा देण्यात आलेली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली, देहु–आळंदी ते पंढरपुर तसेच महाराष्ट्राच्या काना–कोपऱ्यातून पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या हजारो पालख्या, दिंड्या मार्गावर आरोग्य विभागामार्फत मोफत आरोग्य विषयक सेवा सुविधा पुरविण्यात येत आहे. पालखी मार्गावर शिक्षण, जनजागृती, प्रसिद्धीही करण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील मानाच्या विविध पालख्यांच्या मार्गावर देण्यात येणा–या आरोग्य विषयक सेवा, सुविधांची वैशिष्ट्ये आरोग्य विभागाकडून एकूण ६,३६८ अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत महाराष्ट्रातील विविध पालखी मार्गावर आवश्यकतेनुसार वारकऱ्यांना मोफत तपासणी व औषधोपचार करुन आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे. एकूण २५८ तात्पुरत्या 'आपला दवाखान्या'च्या माध्यमातून (प्रत्येकी पाच किलोमीटर अंतरावर १ याप्रमाणे) मोफत सेवा पुरविण्यात येत आहे.

एकूण ७०७ (१०२ व १०८) रुग्णवाहिकांमार्फत पालखी मार्गावर २४७ पध्दतीने आरोग्य सेवा पुरविण्यात येणार आहे. पुणे परिमंडळ पुणे व पुणे जिल्हा परिषद स्तरावरुन पालखी बरोबर एकूण ४ आरोग्य पथके सुसज्ज रुग्णवाहिकेसह अविरत पालखी परतेपर्यंत सोबत राहणार आहेत. एकूण २१२ आरोग्यदुतांमार्फत (बाईक ॲम्बुलन्स) पालखी मार्गावर आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे.

५,८८५ औषधी किटचे विविध दिंडी प्रमुखांना, मालकांना मोफत वाटप करण्यात येणार आहे.

एकूण १३६ हिरकणी कक्षांची स्थापना पालखी मार्गावरील आरोग्य संस्थेच्या ठिकाणी तसेच पालखी तळावर करण्यात आलेली आहे. महिला वारकऱ्यांसाठी एकूण १३६ स्त्रीरोग तज्ञ पालखी मार्गावरील रुग्णालयामध्ये कार्यरत असतील. पालखी मुक्कामच्या प्रत्येक ठिकाणी ५ बेडची क्षमता असलेले, एकूण ८७ अतिदक्षता विभाग उभारण्यात आलेले आहेत. पालखी मार्गावरील सर्व हॉटेल्स व त्याअंतर्गत असलेल्या कामगारांची आरोग्य तपासणी तसेच पाणी नमुने तपासणी करण्यात येत असून, पालखीच्या मुक्कामाच्या ठिकाणच्या किचनची देखील तपासणी करण्यात येणार आहे. पालखी मार्गावर १५६ टँकरव्दारे शुध्द पाणीपुरवठा करण्यात येत असून पालखी मार्ग व मुक्कामाच्या ठिकाणी धूर फवारणी, पाण्याच्या सर्व स्त्रोतांचे ओटी टेस्ट तसेच आरोग्य संस्थांमार्फत जैव कचरा विल्हेवाट करण्यात येत आहे. पालखी मार्गावर आरोग्य विषयक जनजागृती करीता समाजमाध्यमात, डिजीटल, प्रिंट, होर्डिंग्ज तसेच ९ चित्ररथ मार्फत जनजागृती, प्रचार व संदेश लोकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत.

## उसवणकार पुरस्कारप्राप्त देविदास सौदागर यांचा सत्कार



तुळजापूर दि.१७ (प्रतिनिधी) – येथील मराठी साहित्यिक कथा लेखक उसवणकार देविदास सौदागर यांचा मराठवाडा साहित्य परिषद शाखा तुळजापूरच्यावतीने मसापचे कार्यवाह विजय देशमुख, संदीप गंगणे, किरण हंगरगेकर, स्वराज्य संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेश गवळी यांच्या हस्ते लेखक सौदागर व कवयित्री पूजा भडांगे यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारास उत्तर देताना सौदागर म्हणाले की, सतत तीन वर्ष मी या पुरस्कारासाठी नोंदणी केली होती. यावर्षी माझ्या उसवण या ग्रंथाला पुरस्कार मिळाला याचे सारे श्रेय तुळजापूरवासियांचे आहे. मी लहानपणापासून नियमित ग्रंथ वाचन करीत होतो. त्यामुळे मला लिखाणाची सवय लागली या लिखाणातून मी साहित्य तयार केले असे त्यांनी सांगितले. यावेळी चेतन पुरी, जीवनराजे इंगळे, सत्यजित साठे,अण्णासाहेब क्षिरसागर, हरिभाऊ कुलकर्णी, तुषार सुत्रावे, डॉ. सतीश महामुनी, अनिल आगलावे प्रदीप अमृतराव, ग्रंथपाल सुरेश जोशी, पत्रकार गोविंद खुरूद आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कवि दास पाटील यांनी तर सूत्रसंचालन प्रा .विवेक कोरे यांनी व आभार ओंकार मस्के यांनी मानले.

## आदर्श आश्रम शाळेत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत



धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – आदर्श प्राथमिक आश्रम शाळेमध्ये नवीन प्रयोग घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक खंडू पडवळ यांनी पुष्पगुच्छ, गुलाब फुले, फुगेव पुष्पहार देऊन स्वागत केले.

नवीन शैक्षणिक वर्षीत नवीन पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे कोऱ्या कागदावर रंगात दोन्ही पाय बुडवून पाऊल खुणा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी सुरेखा कांबळे यांनी रांगोळी काढली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल राठोड व मल्लिनाथ कोणदे यांनी तर आभार सतीश कुंभार यांनी मानले. यावेळी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यात आली. पर्यवेक्षक शेख अब्बास अली, ज्येष्ठ लिपीक संजीवकुमार मस्के, नागनाथ पाटील, सुर्यकांत बडदापुरे, नागनाथ पाटील, ज्योती राठोड, श्रद्धा सुर्यवंशी, दिपक खबोले, सुधीर कांबळे, कैलाश शानिमे, प्रशांत राठोड, लिंगा आडे, भिकाजी मस्के, गोविंद बनसोडे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

## डीबीएमूहाच्यावतीने राष्ट्रमाता जिजाऊ यांचा स्मृतीदिन साजरा

परंडा दि.१७ (प्रतिनिधी) – येथील डी.बी.ए समूहाच्यावतीने राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांचा पुण्यतिथी ३५० वा स्मृती दिन दि.१७ जून रोजी साजरा करण्यात आला.



परंडा येथील शासकीय विश्रामगृहात डी.बी.ए समूहाचे संस्थापक अध्यक्ष दयानंद बनसोडे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेस पार्टीचे सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे, ॲड दयानंद धेंडे, अल्पसंख्याकचे गनीभाई हावरे, बौद्धाचार्य दिलीप परिहार यांनी सामुदायिक राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला दीप धूप प्रज्वलन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी राजमाता जिजाऊ यांच्या जीवनावर दयानंद बनसोडे, ॲड दयानंद घेंडे, लक्ष्मण शिंदे (देवगाव), दत्तात्रय पाटील (लोहारा) यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमास सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा सरचिटणीस घनश्याम शिंदे, प्रहारचे तालुकाध्यक्ष आप्पासाहेब तरटे, तालुका कार्याध्यक्ष रंगनाथ ओव्हाळ, समाधान ओव्हाळ, अमर गायकवाड, बाळासाहेब चतुर, सिताराम नरोटे, छगन चौधरी, संदिपान कांबळे, नागेश थोरात, सम्यक धेंडे, सुर्योदय सरवदे, महिला लक्ष्मीबाई जाधव, आरती बनसोडे, सुषमा बनसोडे, संगीता बनसोडे, संगीत थोरात, सुजाता साळवे आदींसह महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पवार दाम्पत्याने २७०० वृक्षरोप देऊन लग्नाचा वाढदिवस केला साजरा



तुळजापूर दि.१७ (प्रतिनिधी) – धाराशिव धारूर येथील राज्य शासन छत्रपती शिवाजी महाराज वृक्षमित्र पुरस्काराने सन्मानित अरुण पवार यांनी आपल्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त २७०० रोपांचे वाटप करून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे. नुकतेच अरुण पवार यांनी भंडारा डोंगरावर वृक्षारोपण केले. वृक्ष लागवड चळवळ वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी लग्नाच्या वाढदिवशी राज्यातील विविध संस्थांना २७०० झाडांचे वाटप केले. यामध्ये मलकप्पा शिवशरण यांना १०० रोपे, श्री ज्ञानेश्वर माऊली बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेसाठी संस्थापक अध्यक्ष संतोष सुरवसे यांच्याकडे १०० रोपे, पंडीतगुरु पार्डीकर महाविद्यालय परळी यांना ११०० रोपे घेण्यासाठी अकरा हजार रुपयांचा निधी, सुदिक्षा फाउंडेशन १०० रोपे, विजय वाघमारे फाउंडेशन २०० रोपे , जनकल्याण प्रतिष्ठानसाठी संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब काकडे यांच्याकडे ७०० रोपांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच ज्या संस्थांना रोपे पोहोच करणे शक्य नव्हते, त्या संस्थांना निधी देऊन रोपे खरेदी करण्यास सांगितले आहे. अनेक संस्थांना २५ ते ५० झाडांचे वाटप केले आहे. यामध्ये पिंपळ, वड, करंज, आवळा, चिंच, कडुलिंब, चिकू, शिताफळ, नारळ, जांभूळ, आंबा, पेरू, लिंबू आदींची ५ ते ६ फूट उंचीच्या रोपांचे वाटप करण्यात आले. एक झाड घरोघरी लावण्यासाठी पुढे येऊन नवा आदर्श निर्माण करायला हवा. आज वातावरणात होणाऱ्या बदलामुळे वृक्ष लागवड काळाची गरज बनली आहे. सर्वच नागरिकांनी वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस किंवा इतर कार्यक्रमावर होणारा खर्च कमी करून झाडे लावण्याची गरज आहे. वृक्ष लागवड चळवळ वाढीस लागली पाहिजे, हा वृक्षवाटपाचा हेतू आहे, असे अरुण पवार यांनी सांगितले. यावेळी सरपंच बालाजी पवार ग्राम सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वराज्य पक्षाच्या जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या फेरनियुक्त्या

तुळजापूर दि.१७ (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजीराजे यांच्या स्वराज्य पक्षाच्या जिल्ह्यातील नवीन नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या नियुक्त्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाची ध्येय धोरणे पुढे घेवून जाण्यासाठी करण्यात आल्या. जिल्हाध्यक्षपदी महेश गवळी यांची त्यांच्या कार्याचा आढावा घेवून त्यांची पुन्हा नियुक्ती करत असल्याचे स्वराज्य सरचिटणीस डॉ.धनंजय जाधव यांनी सांगितले. यावेळी जिल्हाध्यक्ष जीवन इंगळे (मराठवाडा प्रवक्ते) सत्यजित साठे (जिल्हा कार्याध्यक्ष) औदुंबर जमदाडे (जिल्हा संघटक) प्रशांत अपराध, (जिल्हा उपप्रमुख), महेश गोरे (उपजिल्हाप्रमुख), दत्तात्रय भोसले (तुळजापूर तालुकाप्रमुख) नागेश लोखंडे (तुळजापूर उपतालुका प्रमुख) जीवन कदम (तुळजापूर तालुकाप्रमुख शेतकरी आघाडी) प्रसाद मुळे (तुळजापूर तालुकाप्रमुख व्यापारी आघाडी) रोहन देशमुख (तुळजापूर तालुकाप्रमुख युवक आघाडी) मनोज जाधव (तुळजापूर तालुका संघटक), अमोल शिंदे (काडगाव सर्कल प्रमुख) कुमार टोले (तुळजापूर शहर प्रमुख) प्रविण गाटे (काटी सर्कल प्रमुख) प्रशांत इंगळे (तुळजापूर तालुका उपसंघटक) बालाजी मुळे (लोहारा तालुका संघटक), ओंकार चौगुले (लोहारा तालुका प्रसिद्धीप्रमुख) आदींच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. यावेळी सरचिटणीस डॉ. धनंजय जाधव म्हणाले की, स्वराज्यच्या पंचसुत्रीप्रमाणे शेतकरी, कामगार, शिक्षण,



आरोग्य व सहकार क्षेत्रामधील सर्व घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण काम करावे. तसेच जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी सर्वांना कामाला लागावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी सोलापूर विद्यार्थी आघाडी जिल्हाप्रमुख आशुतोष तोंडसे, संतोष जाधव, दादाराव बोबडे, द्वारकेश जाधव, विक्रम कदम यांच्यासह अनेक स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## लोकमंगल फाउंडेशनच्यावतीने गुणवंतांचा सत्कार




धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – लोकमंगल फाउंडेशन सोलापूर व श्रीराम ग्रामीण संशोधन विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कॉलेजेस वडाळा यांच्या संयुक्त विद्यमाने पुजारी मंडळ मंगल कार्यालय, तुळजापूर येथे १० वी व १२ वी उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन दि.१७ जून रोजी करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोहन देशमुख होते. तर मार्गदर्शक म्हणून गणेश शिंदे हे होते. प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते आई तुळजाभवानीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तर प्रास्ताविकात श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा संस्थेच्या सचिव डॉ. अनिता ढोबळे यांनी गुणवंत विद्यार्थी सत्कारामागची संकल्पना सविस्तर विशद केली. विद्यार्थी हा घडला जाताना गुणांबरोबरच त्यांच्यातील उपजत कलागुणांना देखील वाव दिला पाहिजे, तरच खरा विद्यार्थी घडू शकतो असे त्यांनी सांगितले. पालकांनी देखील आपल्या पाल्यांमध्ये सुप्त गुण ओळखून त्यात चांगल्या पद्धतीने सुधारणा कशी करता येऊ शकते ? यावर विचार करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच लोकमंगल शैक्षणिक संकुलात राबविला जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीस उपयुक्त अशा विविध उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती त्यांनी दिली. यात प्रामुख्याने होतकरू विद्यार्थ्यांसाठी असलेली उडान योजना, उपलब्ध महाविद्यालय जसे की कृषी महाविद्यालय, औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय, कृषी व्यवसाय व व्यवस्थापन महाविद्यालय, कृषी जैव तंत्रज्ञान महाविद्यालय, विज्ञान व उद्योजकता महाविद्यालय, कृषी तंत्रनिकेतन महाविद्यालय व आयटीआय यातून भविष्यात यश साध्य करण्यासाठी गरजेच्या असलेल्या गोष्टीवर त्यांनी प्रकाश टाकला. लोकमंगल शैक्षणिक समूह नेहमीच विद्यार्थ्यांच्या उद्योजकता वाढीकरिता कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. यात मुख्यत्वे करून कृषी महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या गांडूळ खत प्रकल्प, बायो फर्टीलायझर युनिट, भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान, नर्सरी व्यवस्थापन, दुग्ध उत्पादन निर्मिती प्रकल्प आणि रेशीम कोष उत्पादन विषयी माहिती दिली. तर प्रा. अजित कुरे यांनी विद्यार्थ्यांनी भविष्यात करिअर निवडताना काय काळजी घेतली पाहिजे आणि पुढील वाटचाल सक्षम करण्यासाठी कोणत्या गोष्टी गांभीर्याने घेणे गरजेचे असून या संदर्भातील सर्व बाबी त्यांनी विविध दाखल्यांसह सांगितल्या. आपल्या यशाचे खरे वाटेकरी हे आपले पालक असून त्यांची मान नेहमी उंचवत राहील असेच कार्य आपल्या हातून घडत रहावे अशी अपेक्षा विद्यार्थ्याकडून त्यांनी व्यक्त केली. पालकांनी देखील विशेष करून आपल्या मुलींना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात शिक्षण देऊन तिला स्वावलंबी बनण्याची संधी नक्कीच द्यावी असे आवाहन त्यांनी केले. तर बदलत जाणाऱ्या युगाबरोबर आपण देखील बदलाचा भाग घडला पाहिजे. अन्यथा आपण समूहाच्या बाहेर फेकले जाऊ याची जाणीव त्यांनी विविध उदाहरणांद्वारे करून दिली. शिक्षण पार पडल्यानंतर नोकरीच्या मागे न लागता व्यवसाय करणे आणि त्यासोबतच नवनवीन तंत्रज्ञान शिकून त्याचा वापर आपल्या शेती व व्यवसायात करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. अभ्यासाबरोबरच क्रीडा व कला हे देखील क्षेत्र स्वतः चे नाव मोठे करण्यासाठी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच रोहन देशमुख यांनी विद्यार्थ्यांनी भविष्यात असेच उत्तुंग ध्येय गाठावे अशी अपेक्षा व्यक्त केली. ग्रामीण भागातून येऊन फक्त छोट्याश्या व्यापाराच्या जोरावर सोयाबीन मिल उभारणी करणाऱ्या उद्योजक शाम पाटील यांचा दाखला देऊन विद्यार्थ्यांनी इच्छा शक्तीचा जोरावर आकाशाला गवसनी घालता येऊ शकते हे त्यांनी सांगितले. लोकमंगल फाउंडेशन आणि लोकमंगल शैक्षणिक समूह नेहमीच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या पाठीशी असल्याचे त्यांनी गौरवाने सांगितलं. लोकमंगल समूहाचे संस्थापक सुभाष देशमुख यांची उद्योजक घडवण्याची संकल्पना सर्वांच्या सहकार्याने येणाऱ्या काळात नक्कीच एक यशाचा पल्ला गाठेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी ३१४ गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. उपस्थितांचे आभार लोकमंगल विज्ञान उद्योजकता महाविद्यालयाचे प्रा. गौतम जाधव यांनी तर सूत्रसंचालन लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्रा. अजित कुरे केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी लोकमंगल फाउंडेशन, लोकमंगल मल्टीस्टेट, लोकमंगल बँक, लोकमंगल शैक्षणिक समूहाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यशवंत – मंगळवार दि. १८ जून २०२४
धाराशिव जिल्हा

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

# रोटरी की आशा अंतर्गत मोफत आटा चक्कीचे वाटप




धाराशिव दि १७ (प्रतिनिधी) – रोटरी क्लब ऑफ उस्मानाबाद व रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ मार्फत रोटरी की आशा या उपक्रमा अंतर्गत व डिस्ट्रिक्ट ग्रँट मधून तीन एकल गरजू महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी २ एचपी क्षमतेच्या, ताशी २५ किलो धान्य, मसाला बनवता येईल अशा कमर्शियल ऑटोमॅटिक आटा चक्क्यांचे वाटप करण्यात आले. रोटरी की आशा या कार्यक्रमा अंतर्गत गरजू लाभार्थ्यांना व्यवसाय चालू करून आपली उपजीविका चालवता यावी आणि त्यांना आर्थिक मदत मिळावी यासाठी शोभा रुद्राप्पा हुल्ले, उषा बाळू मगर व वनमाला राजेंद्र कांबळे या तीन लाभार्थ्यांना रोटरी क्लब ऑफ उस्मानाबादच्या अध्यक्षा डॉ. अनार साळुंके, सचिव डॉ. मीना जिंतूरकर यांच्या हस्ते ऑटोमॅटिक इलेकट्रीक पिठाच्या गिरणीचे वाटप करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा प्रांतपाल रो. रवींद्र साळुंके, रेखा पिंपळे व रोटरी सदस्य उपस्थित होते.

# प्रत्येक व्यक्तीचा विकास सहकारातूनच शक्य – पाचपोर





धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रत्येक व्यक्तीचा विकास होण्यासाठी सहकाराची आवश्यकता असून विना सहकार नाही उद्धार हे सर्वार्थाने प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्येकाने सहकारातून समृद्धीकडे जाण्यासाठी काम करणाऱ्या सहकार भारती सोबत जोडून काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर यांनी केल
धाराशिव येथे सहकार भारतीच्यावतीने फको कंपनीच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत संचालक म्हणून निवडून आल्याबद्दल कळंब येथील डॉ वर्षा कस्तुरकर यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे चेअरमन वसंतराव नागदे , अखिल भारतीय सेवा भारतीच्या सचिव चंद्रिका चव्हाण, जिल्हाध्यक्ष संतोष तौर, उपाध्यक्ष उध्दव गपाट, जिल्हा मंत्री डॉ हर्षल डंबळ आदी उपस्थित होते. पुढे बोलताना पाचपोर म्हणाले की, ज्या सहकार चळवळीची सुरुवात महाराष्ट्रात झाली, त्या सहकार चळवळीला गती देण्याची गरज आहे. सर्व क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन करून आर्थिक परिवर्तनाची ताकद सर्वसामान्यांच्या हातात यावी यासाठी सहकार भारती कार्य करत आहे. विना संस्कार नाही सहकार हे ब्रीद डोळ्यासमोर ठेवून सहकार क्षेत्रातल्या संस्थांचे जाळे उभारण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी पुढे यावे असे आवाहन त्यांनी केले. तर देशातल्या सर्वात मोठ्या सहकारी संस्था असलेल्या इफको आणि अमूल या संस्थांमध्ये सरकारी भाग भांडवल नाही. केवळ सर्वसामान्यांच्या शेअर्स गुंतवणुकीमुळे यामध्ये सरकारी हस्तक्षेप कमी होऊन प्रत्येक सभासदाला प्रतिष्ठा मिळाली व मिळत असल्याने त्यांना सांगितले. तसेच सेवा पुरवठादार, शेती आणि शेती प्रक्रिया क्षेत्रात अन्नप्रक्रिया, उद्योग व वाहतूक यासह विज्ञान तंत्रज्ञान आणि सर्व क्षेत्रात सहकारी संस्थांच्या उभारणीला मोठा वाव असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच सहकार भारतीने पतसंस्था, सहकारी बँकात काम करणाऱ्या प्रत्येक घटकाला प्रशिक्षित करून कामात गतिमानता येण्यासह अनेक नागरिकांना यात जोडण्यासाठी मागील काही वर्षांपासून सातत्याने अधिवेशने, प्रशिक्षणे, कार्यक्रम व बैठका देशभर प्रवास करून काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत प्रत्येक राज्यात सहकार क्षेत्र वाढवण्यासाठी आणि समृद्ध सक्षम करण्यासाठी सुरू ठेवण्याचे त्यांनी सांगितले. तर डॉ कस्तुरकर यांनी संचालक म्हणून इफ्को या संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी बी – बियाणे खते यासह इतर उत्पादनांसोबत शेतीसाठी ड्रोनदीदी यासारख्या केंद्र सरकारच्या नवनवीन योजना संकल्पनांमधून महिला शेतकऱ्यांनाही प्रशिक्षित करण्यासह शेती व्यवसायाभिमुख विविध प्रशिक्षण कौशल्य यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून इफकोच्या योजना प्रभावीपणे राबवून जबाबदारीला न्याय द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच नागदे यांनी सहकार क्षेत्रात प्रामाणिकपणा व चारित्र्य यासह पारदर्शकता ठेवल्यास लोकांच्या विश्वासाला पात्र ठरून उत्तम काम करता येते. त्यामुळे सहकार क्षेत्रातील काम करणाऱ्या सर्व घटकांनी याकडे कटाक्षाने लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. तर चव्हाण यांनी महिलांसाठी सुरू केलेल्या बचत गटांपासून विविध व्यवसायातून महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची यावेळी सविस्तर माहिती दिली. डॉ कस्तुरकर या महिला डॉक्टर असूनही इफको या शेतकऱ्यांच्या क्षेत्रात विविध उत्पादने करून सेवा देणाऱ्या कंपनीच्या संचालिका झाल्यामुळे त्यांनी आता महिला शेतकऱ्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी काम करण्याची आवश्यकता व्यक्त केली. तर सत्काराला उत्तर देताना डॉ कस्तुरकर यांनी सहकार भारतीमुळे आपणाला देशपातळीवरील सर्वात मोठ्या सहकारी संस्थेची संचालिका म्हणून काम करण्याची संधी सहकार भारतीमुळे मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आगामी काळात धाराशिव जिल्ह्यासह महाराष्ट्रात आणि देशात शेतकऱ्यांसाठी इफ्कोच्या सर्व योजना बी बियाणे खते यासह ड्रोन दिदी या महिला शेतकऱ्यांसाठीच्या योजनांवर भर देणार असल्याचे सांगितले. प्रास्ताविकात तौर यांनी सहकार भारतीच्या धाराशिव जिल्ह्यातल्या कार्याची सुरुवात असून आगामी काळात सर्व घटकांसाठी काम करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. तर डॉ हर्षल डंबळ यांनी सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या धाराशिव जिल्ह्यातील सहकारी संस्थांनी सहकार भारती सोबत येऊन काम करण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन अभिलाष लोमटे यांनी तर आभार डॉ हर्षल डंबळ यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी सहकारी संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कळंब येथे महिलांचे आरक्षणासाठी रास्ता रोको आंदोलन



कळंब दि.१७ (प्रतिनिधी) – मनोज जरांगे यांच्या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाज महिलांनी आरक्षणाची मागणी करत छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रस्ता रोको आंदोलन केले. त्यामुळे २ तास रस्ता वाहतूक ठप्प झाली होती. तर कळंब उपविभागीय अधिकारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात येऊन निवेदन स्विकारले. सरकारने जरांगे यांच्या मागण्या जर लवकरात लवकर पूर्ण केल्या नाहीत. तर संपूर्ण महाराष्ट्रभर मराठा समाजाच्या महिलांसह पुरुष व तरुण–तरुणी रस्त्यावर उतरतील. होणाऱ्या गंभीर परिणामास सर्वस्वी शासन जबाबदार असेल याची गंभीर नोंद घ्यावी व तात्काळ मराठा समाजास आरक्षण द्यावे. या आंदोलनात ज्योतीताई सपाटे, मीराताई चोंदे, संध्याताई कदम, रूपाली भाकरे, अर्चना चोंदे, आशा चोंदे, सुकेशनी बाकले, भाग्यश्री गुंजाळ, चंद्रकला खामकर, आशा कापसे, भागीरथी चोंदे, सुनीता देवी अडसूळ, मैना शिंदे, अर्चना नखाते, रुकसाना बागवान, विजयमाला चोंदे यांच्यासह इतर महिलांनी सहभाग घेतला.

# संस्कार भारतीच्यावतीने पाचपोर यांचा सत्कार



धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – अखिल भारतीय सहकार भारतीचे राष्ट्रीय संगठन प्रमुख संजय पाचपोर यांचा जिल्हा संस्कार भारती समितीच्यावतीने शाल, कुर्ता, भगवत गीता देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी देवगिरी प्रांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रांत पदाधिकारी सतिश कमल रंगनाथ कोळगे, जिल्हाध्यक्ष श्यामसुंदर भन्साळी, विद्यापीठ सदस्य देविदास पाठक, संस्कार भारती प्रांत चित्रकला विधा प्रमुख शेषनाथ वाघ, जालनाचे विजय देशमुख, धर्माबादचे प्रवीण गायकवाड संकेत, अनिकेत कोळगे, शुभम, कृष्णा गव्हाणे, सार्थकी व सत्यहरी वाघ आदी उपस्थित होते.

# शहरातील खड्डे बुजवण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाची टाळाटाळ



धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – यंदा मृग नक्षत्राच्या सरी मोठ्या प्रमाणात संपूर्ण जिल्ह्यात कोसळलेले आहेत. त्यामुळे सखल भागात पाणी साचत असून रस्ते खड्डेमय होत आहेत. शहरातील देशपांडे स्टँड परिसरातील कमान येथे मोठ मोठाले खड्डे पडले असून सार्वजनिक बांधकाम विभाग कोम्यात गेल्यासारखा वागत आहे. त्यामुळे नागरिकांनीच गांधीगिरी करीत दगडे टाकीत त्यामध्ये बेशरमाची झाडे उभे करून नागरिकांना सावधान! पुढे खड्डा व अपघात प्रवण क्षेत्र असल्यामुळे वाहने सावकाश चालवा व अपघात टाळा असा प्रतीकात्मक इशारा दिला आहे.
धाराशिव शहरातील रस्ते पहिल्याच पावसाने उखडले आहेत. शहरातील प्रत्येक रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले असून त्या खड्ड्यांमुळे रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. धाराशिव शहरातील देशपांडे स्टॅन्ड येथील खाँजा – वैराग, तुळजापूर,सोलापूर, लोहारा कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर कमानी जवळ रस्त्यावर मोठमोठे खड्डे गेल्या अनेक महिन्यापासून पडलेले आहेत. हे खड्डे बुजवण्यासाठी बांधकाम विभागाकडे नागरिकांनी अनेक तक्रारी केल्या. मात्र बांधकाम विभाग आपल्या तोऱ्यात वागत आहे. त्यामुळे या खड्ड्यावरून दररोज ये जा करणाऱ्या हजारो वाहनधारकांना आपला जीव मुठीत धरून वाहन चालवीत मार्ग शोधावा लागत आहे. या रस्त्यावरून चालताना आपण वाहनावरून जात नसून उंटावर बसून चाललो आहोत की काय ? असे नागरिकांना जाणवू लागले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या असून सांधेदुखी मनका दुखी व इतर आजार या खड्ड्यामुळे जडत आहेत तर याच खड्यामुळे एका वयस्कर आजिना आपला जीव गमावावा लागला आहे. त्याच्या निषेधार्थ प्रतीकात्मक खड्डे बुजून सार्वजनिक बांधकाम विभागाचा निषेध आंदोलन आंदोलन करण्यात आले. यावेळी संकेत साळुंके, शहानवाज सय्यद, अस्लम मुजावर आदींसह देशपांडे स्टँड, इंगळे गल्ली, खाजा नगर भागातील अनेक नागरिक उपस्थित होते.

# नीट परीक्षेतील यशाबद्दल तहेजीब शेखचा सत्कार

मुरुम दि.१६ (प्रतिनिधी) – उमरगा तालुक्यातील जवळगा बेट येथील तहेजिब रहीम शेख यांनी पदवी पूर्व वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीटमध्ये पैकी ६२५ गुण घेऊन उज्वल यश संपादन केले आहे. त्याबद्दल तिचा लातूर येथील बसवेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.श्रीकांत गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




# शालेय पोषण आहार कार्यकर्त्यांना सेवेत सामावून घ्यावे यासह इतर मागण्यांसाठी थाळी नाद आंदोलन



धाराशिव १७ (प्रतिनिधी) – जिल्हा शालेय पोषण आहार तयार करणाऱ्या कार्यकर्त्यांना अतिशय तुटपुंजे मानधन देऊन त्यांची बोळवण करण्यासह एक प्रकारे अवहेलना केली जात आहे. तामिळनाडू व हरियाणा १८ हजार रुपये दिले जातात. त्याप्रमाणे राज्यातील कर्मचाऱ्यांना ते वेतन देण्यात यावे तसेच या कार्यकर्त्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे, यासह विविध मागण्यांसाठी धाराशिव जिल्हा शालेय पोषण आहार संघटनेच्यावतीने थाळी नाद आंदोलन करण्यात आले.
दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, शालेय पोषण आहार कामगारांना १० महिन्यांच्या ऐवजी १२ महिने मानधन देण्यात यावे. हरियाना, तामिळनाडू येथे शालेय पोषण कामगारांना प्रति महिना १८ हजार रुपये मानघन आहे. त्या प्रमाणे मानधन देण्यात यावे. शालेय पोषण आहार कामगारांना शिपाई दर्जा देण्यात यावा. शालेय पोषण आहार कामगारांना पोषण आहार बनविण्या व्यतिरीक्त इतरीत काही कामे सांगू नयेत. शालेय पोषण आहार कामगारांना कायमस्वरुपी सेवेत रुजू करुन घ्यावे.
त्यांना विनाकारण कामावरुन कमी करण्यात येवून नये. जर त्याच्याकडून चुक झाली तर त्याची चौकशी करुन नंतरच त्याला कामावरुन कमी करावे, आदी मागण्यासाठी हा मोर्चा डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर विविध घोषणा देत धडकला. या मोर्चामध्ये जिल्हाध्यक्ष कुसूम देशमुख, निर्मला पवार, अली शेख, तेजश्री काशीद, राम काशीद, रेखा पवार, संगिता ढोकळे, सखुबाई गायकवाड, सरस्वती ढवळे, सरस्वती चव्हाण, मीरा अंगरखे, श्रीदेवी ममशेट्टी, आशा पिसे, स्वाती बोंदर, आदींसह कार्यकर्त्या मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# एएनएम व जीएनएमला प्रवेश घेणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती – पाटील




धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – ओबीसी, एनटी, एसबीसी प्रवर्गातील नर्सिंग अभ्यासक्रमाला म्हणजे एएन एम व जीएनएम प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती मिळण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला आहे.
सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या बहुतांश योजना इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विमुक्त जाती भटक्या जाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येतात. परंतू या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अनुज्ञेय अभ्यासक्रमांचे मॅपिंग केले नसल्याने या प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहत होते.
याच अनुषंगाने न्यायालयीन प्रकरणे देखील गेल्या १० वर्षांपासून ओबीसी, एन.टी. एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थी एएनएम आणि जीएनएम नर्सिंग या व्यवसायिक अभ्यासक्रमांपासून केवळ फिस भरणे शक्य नसल्याने शिष्यवृत्ती अभावी वरील प्रवर्गातील शेतकरी व मजुरांची मुले वंचित होते. या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी यासाठी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, के टी पाटील नर्सिंग महाविद्यालयेचे प्राचार्य डॉ. गजानंद वाले, खासगी नर्सिंग स्कूल मॅनेजमेंट असोसिएशनचे अध्यक्ष, नर्सिंग कौन्सिलचे अध्यक्ष यांनी वेळोवेळी शासनस्तरावर लक्षवेधी पत्रव्यवहार व बैठका घेऊन पाठपुरावा केला. अखेर या पाठपुराव्यास यश मिळाले असून शासनाने मॅपींग करण्यास मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांमध्ये एएनएम, जीएनएम नर्सिंगचा समावेश आहे. या निर्णयामुळे या क्षेत्रात या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा कमी झालेला टक्का शिष्यवृत्तीच्या माध्यमातून वाढण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय – दूरध्वनी – २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक – **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# शास्त्रज्ञांच्या समाजाप्रती संशोधनातील त्यागाचे आपण ऋण मानावे :रमेशजी बियाणी

**लातूर / प्रतिनिधी:** महिला वैज्ञानिकांचे कार्य विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात शिकणाऱ्या विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी आहे.वैज्ञानिकांच्या समाजाप्रती केलेल्या संशोधनासाठी आपण नेहमी ऋण मानावे.विज्ञानाचे विद्यार्थी म्हणून आपणही चांगला अभ्यास व संशोधन करून समाज उपयोगी घटक बनावे. तसेच सातत्य,प्रयत्न व जिज्ञासा अंगीकारल्यास यातूनच एखादा उत्तम वैज्ञानिक निर्माण होऊ शकतो,असे मत दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी यांनी व्यक्त केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१६ जून २०२४ रोजी वैज्ञानिक मबारबरा मॅकक्लिंनटॉकफ यांची १२२ वी जयंती साजरी करण्यात आली.वैज्ञानिकांच्या जयंतीनिमित्त त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून अभिवादन करण्याचा हा उपक्रम महाविद्यालय आपले कर्तव्य मानून राबवत आहे. कार्यक्रमाची सुरुवात दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड



यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.डॉ.कोमल गोमारे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. मबारबरा मॅकक्लिंनटॉकफ यांच्याबद्दल जैवतंत्रज्ञान द्वितीय वर्षातील विद्यार्थीनी समृद्धी जगदाळे हिने माहिती दिली. त्या काळची पुरुषप्रधान संस्कृती आणि खुद्द मॅक्लिंलटॉक यांच्या आईचा विरोध असताना त्यांची कामाबद्दलची जिज्ञासा जोपासत त्यांनी नोबेल पारितोषिक पर्यंतचा प्रवास आपल्यासारख्या विद्यार्थिनीसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत बारबरा यांच्या संशोधनाबद्दलची माहिती प्रकाशझोतात आणली.

बारबरा मॅकक्लिंनटॉक यांचा जन्म १६ जून १९०२ रोजी झाला. या एक अमेरिकन शास्त्रज्ञ आणि सायटोजेनेटिकिस्ट होत्या, ज्यांना १९८३ चे फिजिओलॉजी किंवा मेडिसिनचे नोबेल पारितोषिक मिळाले होते. मॅकक्लिंटॉकने १९२७ मध्ये कॉर्नेल विद्यापीठातून वनस्पतीशास्त्रात पीएच.डी.प्राप्त केली. तिथून त्यांनी मक्याच्या साइटोजेनेटिक्सच्या विकासाची प्रमुख म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली, जी त्यांच्या उर्वरित आयुष्यासाठी त्यांच्या संशोधनाचा केंद्रबिंदू होती. १९२० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून, मॅक्लिंलटॉकने क्रोमोसोम्स आणि मक्याच्या पुनरुत्पादनादरम्यान ते कसे बदलतात याचा अभ्यास केला.त्यांनी मक्याच्या गुणसूत्रांची कल्पना करण्याचे तंत्र विकसित केले आणि मायक्रोस्कोपीचा वापर केला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड व उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रोहिणी शिंदे, डॉ.संगीता जाजू,प्रा. बिडकर, प्रा.शिंदे- पाटील, प्रा.गावकरे, प्रा.मदने तसेच महाविद्यालयातील इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## जननायक संघटनेची नुतन जिल्हा कार्यकारिणी जाहीर

लातूर / प्रतिनिधी- जननायक संघटना ही सामाजिक कार्याच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नाला न्याय देण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून करीत आहेत. या संघटनेची नूतन कार्यकारिणी जननायक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब कोरे यांच्या सुचनेनुसार ही कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून जननायक संघटनेच्या जिल्हाध्यपदी सूर्यकांतराव शेळके यांची तर जिल्हा कार्याध्यक्षपदी निळकंठराव पवार यांची वर्णी लागलेली आहे.तर उपाध्यक्षपदी बब्रूवान पवार, बी.टी. कदम परीक्षीत सांडूर, सुभाषअप्पा सुलगुडले, सरचिटणीसपदी केशरताई महापुरे, प्रतापराव शिंदे, बाबासाहेब देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. चिटणीस पदी महादेवराव गायकवाड, वैजनाथराव जाधव, मेजर शिंदे, शिवपूजे, अमित पाटील यांची निवड करण्यात आली आहे तर सदस्यामध्ये गोविंद पंडगे, सहारा शेख, सुरेखा मुळे, ज्योतीताई भोकरे व शोभाताई पाटील आदींचा समावेश आहे. तर जननायक संघटनेच्या लातूर जिल्हा युवा जिल्हाध्यक्षपदी विश्वजीत पद्मसिंह पाटील कव्हेकर यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# साने गुरुजी मा.विद्यालयात प्रवेशोत्सव साजरा

## गुलाब पुष्प व मोफत पाठ्यपुस्तकाने स्वागत



लातूर : येथील सानेगुरुजी शैक्षणिक संकुलातील साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचा प्रवेशोत्सव विविध शैक्षणिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रवेशद्वारावर येणाऱ्या विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन उत्साहात स्वागत केले. इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या मोफत पाठ्यपुस्तकाचेही वाटप या प्रसंगी करण्यात आले.

**शाळेचा पहिला दिवस म्हणजे केवळ औपचारिक परिचय नव्हे, तर तो आनंदमय सोहळा आहे. शैक्षणिक प्रवासाचे संगोपन आणि समृद्ध करण्याची सुरुवात आहे, यातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाचा आदर, जबाबदारी आणि आत्मीयतेची भावना मिळते.**
**- इस्माईल शेख**
मुख्याध्यापक
(साने गुरुजी माध्यमिक विद्यालय लातूर)

जिल्ह्यात वृक्ष लागवड चळवळ व्यापक व्हावी म्हणून प्रशासन व विविध सामाजिक संस्था प्रयत्नशील असून त्याचाच एक भाग म्हणून लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या शाळेतील पहिले पाऊल, वृक्ष लावून या संकल्पनेस प्रतिसाद म्हणून शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करत विद्यार्थ्यांना वृक्षांचे व वृक्ष लागवडीचे महत्व सांगण्यात आले.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक इस्माईल शेख तर सहशिक्षक गंगाधर डिगोळे, कावळे स्मिता, परळे गणेश, धोत्रे वैभव, गायकवाड राहुल, माने सचिन, कोयले हरिदास, जगताप शिवगंगा, काळगापुरे कमल, यादव मिनाक्षी, पवार शशिकांत, डोनगावे कोमल, गायकवाड सतीश, पवार अमोल, पाटील सुनंदा, वडवळे नवनाथ, दयानंद लहाडे, बनसोडे पोर्णिमा , भरत सूर्यवंशी आदि शिक्षक तथा सावंत बालाजी, सुडे दत्तात्रय, पांचाळ सुर्यकांत हे शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# नांदेड येथे भव्य जलतरण स्पर्धा संपन्न





नांदेड(प्रतिनीधी): एन्जॉय स्विमिंग ग्रुप नांदेडतर्फे ड. दागडिया व ड. दिलीप ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आलेल्या २९ व्या भव्य जलतरण स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या असून २६९ स्पर्धकांपैकी यशस्वी ठरलेल्या १२० जलतरणपटूंना आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या हस्ते आकर्षक पारितोषिके देण्यात आली. पुढील वर्षी राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यासाठी एन्जॉय ला मदत करणार असल्याची घोषणा आ. कल्याणकर यांनी याप्रसंगी केली.

कै.शांताराम संगणे जलतरणिका नांदेड येथे रविवारी सकाळी सात वाजता नांदेड भूषण नवनिहालसिंघ जहागीरदार यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ स्वयंसेवक अमोल आंबेकर, शेखर भावसार, भास्कर अत्रे, परीक्षित भांगे, केदार मालपाणी यांची प्रमुख उपस्थिती होती. एन्जॉय स्विमिंग ग्रुपचे दिवंगत सदस्य कै. व्यंकटराव मोरे, कै. बालकिशन जाजू, कै. दशरथ सुत्रावे यांच्या प्रतिमेला डॉ. पी सुदर्शन, दीपक बोधने, चंद्रप्रकाश लालवानी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. या स्पर्धेमध्ये विविध ३० वयोगट पाडण्यात आले होते. त्यामध्ये पन्नास मीटर फ्रीस्टाइल व दोनशे मीटर आयएम च्या दोन वेगवेगळ्या स्पर्धेमध्ये अभय देवकते,प्रतीती भावसार,कुलप्रकाशसिंघ पुजारी,अजिंक्य नरवाडे,इशान चालीकवार,मुकेश कबनुरे,श्रीषा देशमुख,श्रीकृष्ण पिन्नलवार,रेवांशु बिंगेवार,संकेत तोटावाड यांनी बाजी मारली. विविध गटात प्रथम पुरस्कार मिळवणाऱ्या मध्ये रवी नांगरे,सोनल चव्हाण, शेखर भावसार, प्रमोद कुलथे, शरणाप्पा इरसगडाप्पा, अंजना शिंदे, मनन सावरगावे, जिनल बिंगेवार, सपना हिंगमिरे, नागेश पवार, अर्जुन डाकोरे, रामेश्वर जाधव, शेख फिरोज, निशा गुडमेवार, अभिजीत भोसले, वैजयंता पाठक, ओमप्रकाश गुंजकर, प्रकाश वाकोरे यांचा समावेश आहे. डॉ. सुयश कथाडे, देविदास भालेराव, मारुती बादलगावकर, श्रीपाल पोरवाल,नंदींनी जैस्वाल,मनन सावरगावे, श्रेया सोनटक्के, प्राची बोबडे, गौरव केंद्रे, प्रणव बुचडे, कृष्णा वाईकर, रुक्मिणी सोनटक्के, बालाजी वाकोडे, राजेंद्र ताटे यांनी दुसरा क्रमांक मिळवला. चुरशीची लढत देऊन देखील भास्कर अत्रे,नवनाथ सावरगावे,विहान कांबळे, राजेश्वर बौधकुर, गंगाधर सूर्यवंशी,आरोही मोगले, आदित्य नरवाडे, जान्हवी जाधव, सुधाकर देव, उत्कर्ष कदम, आदित्य राजुरे यांना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

बक्षीस वितरण आ. कल्याणकर, पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. प्रवीण पाटील, ॲड. चिरंजीलाल दागडिया, जयप्रकाश मुंदडा, गंगाधर बडवणे, उमेश दिघे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी प्रमुख अतिथींचा सत्कार दीपक बोधने,मुकेशभाई ठक्कर, बालाजी एलगंटवार, सुभाष गादेवार, चंद्रप्रकाश लालवानी,मुरलीधर अट्टल, लक्ष्मीकांत माळवतकर यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक करताना एन्जॉय चे सचिव दिलीप ठाकूर यांनी स्पर्धा घेण्यामागची भूमिका स्पष्ट केली.आ. कल्याणकर, ड. प्रवीण पाटील,नवनिहालसिंघ जहागीरदार, जयप्रकाश मुंदडा,ड.दागडिया यांची समायोचित भाषणे झाली.शिरीष गीते यांनी आभार प्रदर्शन केले. दिलीप ठाकूर व नवनाथ सावरगावे यांनी केलेल्या उत्कृष्ट धावत्या वर्णनामुळे स्पर्धेची रंगत वाढली.मुख्य पंच राजेश सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली गजानन ठाकूर, तुकाराम निलेवाड, मधुकर केंद्रे, प्रकाश गोवंदे, यादव डुबुकवाड, संजय जोंधळे, शेख रब्बानी, बालाजी कोकुरवार, मनोज कंडेरा, ओमसिंग ठाकूर, मयूर केंद्रे, सोहेल शेख, समीर शेख, अभिजीत कांबळे, माधव गच्चे यांनी तांत्रिक बाजू यशस्वी सांभाळली. समयलेखक म्हणून शैलेश तोष्णीवाल यांनी चोख बाजू सांभाळली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पुष्कर तोष्णीवाल, रमेश डागा, द्वारकादास साबु, केशव मालेवार, व्यंकटेश जिंदम, , भास्कर स्वामी, डॉ. संतोष मालपाणी, डॉ.राजेश अग्रवाल, डॉ. सुनील बासटवार, नारायण चव्हाण, नरेंद्र कुलकर्णी, वसंत तोष्णीवाल, सुनील जाधव यांनी सहकार्य केले. स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने आलेल्या क्रीडा रसिकांची चहा फराळाची उत्तम व्यवस्था एन्जॉय स्विमिंग ग्रुप तर्फे करण्यात आली होती. गेल्या २९ वर्षापासून नियमितपणे जलतरण स्पर्धा घेत असल्याबद्दल एन्जॉय स्विमिंग ग्रुपचे क्रीडाप्रेमी नागरिक कौतुक करत आहेत.

## वैज्ञानिकांचे कार्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी : अरविंदराव सोनवणे

लातूर: येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि. १५ जून २०२४ रोजी वैज्ञानिक ' थॉमस हकल वेलर ' यांची १०९ वी जयंती साजरी करण्यात आली.वैज्ञानिकांच्या जयंतीनिमित्त त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून अभिवादन करण्याचा हा उपक्रम महाविद्यालय आपले कर्तव्य मानून राबवत आहे.

वैज्ञानिकांच्या जयंती उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल व विज्ञान तंत्रज्ञानातील विद्यार्थी संशोधनासारख्या क्षेत्रात कार्य करून महाविद्यालयाचे नावलौकिक करतील असे मत दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरविंदजी सोनवणे यांनी मत व्यक्त केले.

याचबरोबर अखंड व अविरतपणे चालू असलेल्या वैज्ञानिकांच्या कार्यक्रमांतर्गत पोलिओमायलेटीस व्हायरस संबंधित दिलेली माहिती समाज घटकांना उपयुक्त ठरू शकते अशा प्रकारचे विविध वैज्ञानिकांची माहिती आत्मसात करून विद्यार्थ्यांनी वैज्ञानिकांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सतत कार्य करून जनजागृती करावी.तसेच अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्वगुणसंपन्न विद्यार्थी म्हणून समाजोपयोगी संशोधन करण्यासाठी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची सुरुवात दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी,उपाध्यक्ष अरविंदजी सोनवणे,सचिव रमेशजी बियाणी,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली.डॉ.कोमल गोमारे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.थॉमस वेलर यांच्याबद्दल जैवतंत्रज्ञान द्वितीय वर्षातील विद्यार्थीनी अर्पिता कुलकर्णी यांनी माहिती दिली.

थॉमस हकल वेलर (१५ जून १९१५ - २३ ऑगस्ट २००८) हे अमेरिकन विषाणूशास्त्रज्ञ होते. त्यांना, जॉन फ्रँकलिन एंडर्स आणि फ्रेडरिक चॅपमन रॉबिन्स यांना १९५४ मध्ये मानवी भ्रूण त्वचा आणि स्नायूंच्या ऊतींचे मिश्रण वापरून चाचणी ट्यूबमध्ये पोलिओमायलिटिस विषाणूंची लागवड कशी करावी हे दाखविल्याबद्दल फिजियोलॉजी किंवा मेडिसिनमध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे, दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.गणेश लहाने,पर्यवेक्षिका डॉ.वैशाली पाटील व डॉ.संध्या वाडीकर,डॉ.टी.एच.मुजावर, डॉ.रामशेट्टी शेटकार,प्रा.मनीषा बाजपाई तसेच महाविद्यालयातील इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# प्रदूषणामुळे लालचुटूक मृग किटकांचे दर्शन झाले दुर्लभ

एप्रिल-मे महिन्यात शेतकरी राजा आपल्या शेतीत काबाडकष्ट करुन शेत जमीन नांगरणी व वर्णी करुन पेरणी करण्यात लायक बनवितो.शेत जमीनीची मशागत करतांना त्यांच्या उघड्या अंगाची ल्हाई-ल्हाई होते.



अंगातून घामाचे पाट वाहतात.शेत जमीन अगदी आरश्यागत चकचक करुन पावसाच्या प्रतिक्षेत डोळे आभाळाकडं लावून वरुण राजांची आराधना करतांना शेतकरी राजा आपल्या शेतात पेरणीच्या नियोजनात तिफणं सज्ज ठेवतो.त्या वेळी उन्हाळा सरते शेवटी बळीराजा निवांत असतो.

पावसाळ्याच्या सुरवातीला अनेक कीटकांची गर्दी रानावनात दिसते,पण मृगाचा किडा या सर्वांहून पूर्णपणे वेगळा दिसतो . हा किडा शेतीसाठी खूप उपयुक्त आहे,तो शेतजमीनीला हानिकारक असलेल्या उपद्रवी कीटकांचा फडशा पाडतो.यामुळे जमिन , पिके, पेरणीनंतर आलेल्या कोंबांचे रक्षण होते.जमिनीसाठी उपयुक्त बुरशी,कवके,जीवाणूंजवळ मृग किडा राहतो . वाळवी, छोटे कोळी,नाकतोडे हे मृग किड्याचे प्रमुख खाद्य आहे.

शेतातील एप्रिल,मे मधील जोरदार वळिवानंतर ते हळूहळू जमिनीबाहेर येतात.अन्यवेळी ते जमिनीखाली असतात. विशेष म्हणजे,पावसाळ्याच्या सुरवातीलाच दर्शन देणारा हा किडा वर्षभर अजिबात दिसत नाही.आमच्या भागात जास्त प्रमाणात आढळणारा किटक नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.त्यांचे दर्शन फक्त साधारण पहाटे , सायंकाळी चार ते सहा वेळेतच तो शेतात दिसतो. रोहिणी किंवा मृगापासून पाऊस धुवांधार कोसळू लागला, म्हणजे ते पुन्हा जमिनीखाली जातात.त्यांचे शरीर मलमल व मऊशार असते.हाताने स्पर्श केल्यास वारंवार स्पर्श करावा असे वाटते. लालभडक रंगांमुळे हे सर्वांचे लक्ष वेधून घेतात. हातात घेतल्यानंतर ते(पैसा) नाण्याप्रमाणे स्वतःला गुंडाळून घेतात.मृत झाल्याचे भासवितात. आकार पाच ते सहा मिलीमीटर असतो. शरीराखाली आठ पाय असल्याने तो अष्टपाद किटक वर्गात मोडत असून कोळ्याप्रमाणे तोंड असते. संशोधकांच्या म्हणण्यानुसार, पाठीवरील सूक्ष्म तंतुमुळे मृग किड्याला परिसराचे अचूक ज्ञान होते. हे तंतू संवेदकांप्रमाणे काम करतात.लालभडक रंगांमुळे अन्य छोटे जीव कीटक मृग किड्यांवर हल्ला करत नाहीत.हा जीव निसर्गाची देणगीच वाटते. मृग कीटकांची काव्यरूप वर्णन करायचे झाल्यास पुढील प्रमाणे असावे असे वाटते.

तुझे लालचुटूक शरीर,
माझ्या मनाला भावते!
तुझ्या कोमल स्पर्शाने,
मलमलची याद येते!
तुला पाहताच पेरणीची
बळीराजास स्फूर्ती येते!
मृगाचा पाऊस पडतांना,
मशागतीचे चिजच होते!
म्हणे तू कृषकांचा मित्र,
अंकुराचे जतनच होते!
तुझ्या दर्शनाने आम्हाला,
पाऊसाची चाहूल लागते!
तुझे अस्तित्व चित्रातच,
फक्त हा धोका संभवते!
निसर्गाचा अद्भुत नजराना,
जतन व्हावे असेच
वाटते!

गोपाळसुत दत्तात्रय एमेकर गुरुजी,
क्रांतिभुवन बहाद्दरपुरा ता.कंधार
९८६०८०९९३१



# वृक्ष लावून व वृक्षभेट देऊन ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या वतीने उपक्रम

लातूर / प्रतिनिधी- इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातून, त्याच्या नावे शाळेच्या परिसरात एक झाड लावण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या वतीने महाराणा प्रताप प्राथमिक विद्यामंदिर लातूर येथे ८० विद्यार्थ्यांचे स्वागत झाड देऊन करण्यात आले, तसेच विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

अंकुर विद्यानिकेतन लातूर येथे आज पहिल्या दिवशी शाळेत आलेल्या ४० विद्यार्थ्यांना फुल रोपे देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले व कुंडीमध्ये झाडे लावण्यात आली.

जिल्हा परिषद शाळा लमानी तांडा आदर्श कॉलनी लातूर या ठिकाणी शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेमध्ये आलेल्या पन्नास विद्यार्थ्यांना झाड देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकारी माननीय वर्षा ठाकूर घुगे यांच्या संकल्पनेतून पुढे आलेल्या माझं लातूर, हरित लातूर उपक्रमातून वृक्ष लागवड मोहिमेला गती देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून शाळेतील पहिले पाऊल, वृक्ष लावून व वृक्षभेट देऊनफ हा उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम संपन्न करण्याकरिता महाराणा प्रताप प्राथमिक विद्यामंदिरच्या दिपाली राजपूत मॅडम, काळे सर, कळकेकर मॅडम, अंकुश विद्यानिकेतन लातूरचे संभाजी नवघरे सर, परमेश्वर सावंत सर, ज्ञानोबा केंद्रे सर, जिल्हा परिषद शाळा नमन तांडा च्या ठाकूर मॅडम, क्षीरसागर मॅडम, नगरसेविका श्वेता लोंढे व ग्रीन लातूर वृक्ष टीमचे डॉ. पवन लड्डा, दयाराम सुडे, आकाश सावंत, रवी तोंडारे व सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.



# सी.के.मुरळीकरांचे दुर्बलाचा निवारा उभारुन अभिष्टचिंतन

## संवेदनशील पत्रकार,कार्यकर्त्यांचे होतेय तोंड भरुन कौतुक!

लातूर,/ प्रतिनिधी-कोणी आपल्या मित्र,स्नेही,नातलगांचे वाढदिवस विविध प्रकारे साजरे करतात,पण पत्रकार बाळ होळीकर व खबर से हकिकत तक चे संपादक शिरीषकुमार शेरखाने यांनी त्या भागातील उस्मान शेख गुरुजी व इतरांच्या श्रमदानाने,शिवसेनेचे नेते,माजी बँक अधिकारी,राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सी.के.मुरळीकर यांच्या दि.१२ जून या वाढदिवसानिमित्त कृपा सदन इंग्लिश स्कूलच्या भींतीलगत निवार्याअभावी गेल्या आठवड्यापासून पावसात भिजत असलेल्या शारिरीक दुर्बल व्यक्तीला निवारा उभारुन,दाढी,कटींग करुन,शाल पांघरुन उब देवून मुरळीकरांचे अभिष्टचिंतन केले.

१२ जूनच्या रात्री खुप पाऊस होता.. सकाळीही भूरभूर चालूच होती.पत्रकार बाळ होळीकर हे कृपा सदन इंग्लिश स्कूल चप्पल शिवून घेण्यासाठी निघाले होते.पण तो कारागीर रात्रीच्या धोधो पावसाने भिजला होता.अशक्त झाल्याने त्यांना नीट कामही होत नव्हते,त्यांची ती अवस्था पाहून होळीकर यांनी सी.के.मुरळीकर यांना कॉल करुन तुमचा वाढदिवस एका गरीबाला आसरा उभारुन देवून साजरा करणार असल्याचे सांगितले,असता मुरळीकरांनी आपण दोन दिवस बाहेर आहोत,आल्यानंतर ते पाहू म्हटले. शुक्रवारी मुरळीकरांनी होळीकरांना या कामासाठी लागणारे पैसे देवू केले.मग शिरीषकुमार शेरखाने यांना बोलावून होळीकरांनी त्या कारागीराच्या निवार्यासाठी लागणारे ताडपत्री,बायंडींग तार,खिळे,वायसर तसेच शनिवारी सकाळी ८ वाजता दोन दांड्या,वेळू खरेदी करुन या कामासाठीचा हातोडा,करवत,कुर्हाड,पहार,मोजणीटेप घेवून ते ठिकाण गाठले.तिथे पाहतो तर प्रल्हाद वाघमारे हे भिजलेल्या कपड्यात झोपले होते,त्यांना जागे करत प्रत्यक्ष कामाला आरंभ केला.

यावेळी माजी मुख्याध्यापक उस्मान शेख,बँक कर्मचारी राजेंद्र परसबोणे,बालाजी नरवटे,मुसा शेख यांनीही याकामी हातभार लावला आणि चार तासात तिथे बाराबाय सातचा निवारा तयार झाला.सदर इसमाचे वाढलेली दाढी-डोक्याचे केस कापण्यासाठी कारागीर मिळाला नाही,तेव्हा होळीकरांनी स्वतःच ते काम उकरुन टाकले.पावसाने भिजलेल्या कपड्यांमुळे तो गरीब आजारी पडेल म्हणून नवीकोरी मोठी शालही पांघरुन उब दिली.त्यावेळी प्रल्हाद वाघमारेंच्या चेहर्यावर नवी झळाळी येवून गेली.आज अचानक उभालेला हा आसरा पाहून या समाजसेवेबद्दल अनेकांनी धन्यवाद दिले.सी.के.मुरळीकरांचा वाढदिवस,जोरदार पावसाचे आगमन आणि शिरीषकुमार शेरखाने यांच्यामुळे,उस्मान शेख,बँक कर्मचारी राजेंद्र परसबोणे,बालाजी नरवटे,मुसा शेख यांच्यामुळे एका गरीबाच्या डोक्यावर निवारा उभा करता आला,असे बाळ होळीकर यांनी सांगितले.

# बकरी ईद चे औचित्य साधून केले सर्व धर्मिय कार्यकर्त्यांनी - रक्तदान



दि.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती लातूर च्या वतीने बकरी ईद निमित्त कुर्बानी नव्हे, जीवनदान देऊया. याप्रमाणे आज शासकीय वैद्यकीय म हाविद्यालयाचे रुग्णालय व रक्त संकलन केंद्र लातूर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. धर्म, जात यापलीकडे जाऊन, म ानवतेशी नाते जोडून व वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासून धर्माच्या व जातीच्या भिंती दूर करून, मानवता हाच खरा धर्म आहे हा संदेश या रक्तदान शिबिरातून देण्यात आला.

धर्माने सांगितलेल्या म ानवी मूल्यांमध्ये ✻ङ्गत्यागङ्ग✻ हे महत्वाचे मूल्य आहे. ईस्लाम धर्मात ही उच्च ध्येय सिध्द करण्यासाठी ङ्गकुर्बानीङ्ग किंवा सर्वस्वाचा त्याग करण्याची शिकवण आहे. या त्याग आणि बलिदानाचे प्रतीक म्हणून मईद-उल-अजहाफ (बकरी ईद) चा सण इस्लाम धर्मियांमध्ये साजरा केला जातो. या निमित्ताने बकरे अथवा इतर प्राण्यांची कुर्बानी देण्याची प्रथाही पाळली जाते.

आजच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करता, सर्व धर्मियांनी धार्मिक सण हे अधिका अधिक समाजाभिमुख व मानवतावादी करणे हे धम र्िचेच उन्नयन आहे. हाच विचार समोर ठेवून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती ङ्गबकरी ईदङ्ग निमित्त पशूची कुर्बानी देण्याच्या प्रथेमध्ये कालानुरूप बदल व्हावा व या प्रथेला पर्याय म्हणून राज्यव्यापी रक्तदान सप्ताहङ्ग अभियान शाखा-शाखांमध्ये राबवत आहे .

या शिबिरात राज्य सरचिटणीस रुकसाना मुल्ला, इम्रान सय्यद, जाकीर शेख, ललिता दरेकर, सुवर्णा बुरांडे, डॉ. गणेश गोम ारे, तुकाराम महाजन, अभिषेक जाधव, डॉ. सतीश चव्हाण, जिल्हा प्रधान सचिव सुधीर भोसले, लातूर शहर कार्याध्यक्ष प्रा. दशरथ भिसे, यांनी रक्तदान केले. रक्तदानासाठी नोंदणी केलेल्या पैकी चार कार्यकर्त्यांना वजन, वय, एच.बी. या कारणांनी सध्या रक्त देता येणार नाही असे सांगितले

यावेळी शासकीय रुग्णालय रक्त संकलन केंद्राच्या वतीने महाराष्ट्र अंनिस लातूर चा, या रक्तदान शिबीर आयोजनाबद्दल सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. या शिबिरासाठी राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, जिल्हा कार्याध्यक्ष अनिल दरेकर, जिल्हा प्रधान सचिव हनुमंत मुंढे, महिला विभाग प्रमुख ज्योती ढगे, गणेश सावळकर, अरमान सय्यद, कबीर सय्यद, विशाखा भोसले, सचिन औरंगे, यांच्या उपस्थितीत तसेच डॉ. जणजीत चव्हाण, रक्त संक्रमण अधिकारी, गुंगेवाड जे. जी. प्रयोगशाळा तंत्रज्ञब, सिद्धेश्वर चौधरी, समाजसेवा अधीक्षक. श्री विनोद सूर्यवंशी, प्र. शा. परिचर. श्री अतिश नवगिरे, व्यवस्थापक. यांचे आधीपत्याखाली संपन्न झाले.

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ७३ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार प्रतिभा भ्र. प्रशांत रणदिवे ज्यापेक्षा पत्नी नामे प्रशांत पि. राजाराम रणदिवे हे दिनांक १७/०७/२०२३ रोजी मौजे मुंबई येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | प्रतिभा भ्र. प्रशांत रणदिवे | २६ | पत्नी |
| २) | नव्या पि. प्रशांत रणदिवे | ०४ | मुलगी |
| ३) | शांताबाई भ्र. राजाराम रणदिवे | ५५ | आई |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १५/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २५/०६/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ६४ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार प्रभाकर पि. विश्वनाथ बिरादार ज्यापेक्षा पत्नी नामे कमलाबाई प्रभाकर बिरादार हे दिनांक ०४/०८/२०२३ रोजी मौजे कमालवाडी ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | प्रभाकर पि. विश्वनाथ बिरादार | ७७ | पती |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक ०६/०४/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २०/०६/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा
**मा.बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४००/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Ganpat Sangappa Patil हे दिनांक २०.०५.२०२४ रोजी Sahyadri Hospital Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Sushila W/o. Ganpatrao Patil, Age 66 yrs, Occu. Household. Address R/o. Nagalgaon Tq.Udgir Dist.Latur
2) Jayprakash S/o. Ganpatrao Patil, Age 43 yrs, Occu. Agri, Address R/o. Nagalgaon Tq.Udgir Dist.Latur
3) Omprakash S/o. Ganpatrao Patil, Age 37 yrs, Occu. Agri, Address R/o. Nagalgaon Tq.Udgir Dist.Latur
4) Vrushali W/o. Anil Chavale, Age 47 yrs, Occu. Household, R/o. Ahmedpur Tq.Ahmedpur Dist.Latur
5) Vaishali W/o. Amit Siddeshware, Age 40 yrs, Occu. Household, R/o. Udgir Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमूद ५ हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Sushila W/o. Ganpatrao Patil | 66 | Wife |
| 2) | Jayprakash S/o. Ganpatrao Patil | 43 | Son |
| 3) | Omprakash S/o. Ganpatrao Patil | 37 | Son |
| 4) | Vrushali W/o. Anil Chavale | 47 | Daughter |
| 5) | Vaishali W/o. Amit Siddeshware | 40 | Daughter |

अर्जदार याने Narayan Sambhaji Shrirame या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Narayan Sambhaji Shrirame यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः १४/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः २४/०७/२०२४

आदेशावरुन

(ए.बी.सुर्यवंशी) कनिष्ठ लिपिक, ४ थे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर — (एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, ४ थे सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा
**मा.एन.जे. चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३७९/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Gangaram S/o. Tulshiram Kendre हे दिनांक ०६.०४.२००३ रोजी At. Gutti, Tq.Jalkot Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

Bhagwat S/o Gangaram Kendre, Age 75, Occu- Agri.
R/o. Gutti, Tq.Jalkot Dist.Latur

यांनी खालील नमूद हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Chabutarbai W/o. Gangaram Kendre | 90 | Wife |
| 2) | Bhagwat S/o. Gangaram Kendre | 75 | Son |
| 3) | Sudamati W/o. Ramkishan Gutte | 70 | Daughter |
| 4) | Dhondubai W/o. Ram Sangle | 58 | Daughter |

अर्जदार याने Gangaram S/o. Tulshiram Kendre या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Gangaram S/o. Tulshiram Kendre यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः ०१/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १८/०४/२०२४

आदेशावरुन

(ए.आर. गायकवाड) कनिष्ठ लिपिक, ३ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर — (एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा
**मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३८९/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Ikramoddin S/o Amirsab Maniyar हे दिनांक ०१.०५.२०२४ रोजी Global Super Speciality Hospital VIP Road, Nanded येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

Nirmala (Sima) W/o Ikramoddin Amirsab Maniyar,
Age 41 yrs, Occu. H.H.,
R/o. Vikas Nagar Degloor Road, udgir Tq.Udgir Dist.latur

यांनी खालील नमूद ५ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Nirmala (Sima) W/o. Ikramoddin Amirsab Maniyar | 41 | Wife |
| 2) | Saniya Ikramoddin Maniyar | 8 | Daughter |
| 3) | Afreen Ikramoddin Maniyar | 40 | Wife |
| 4) | Misba Tahreen Ikramoddin Maniyar | 23 | Daughter |
| 5) | Nadim Ikramoddin Maniyar | 20 | Son |

अर्जदार याने Ikramoddin S/o Amirsab Maniyar या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Ikramoddin S/o Amirsab Maniyar यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः १३/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः २६/०७/२०२४

आदेशावरुन

(संतोष डी. शिंदे) कनिष्ठ लिपिक, सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर — (पी.एस.देशपांडे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा
**मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४०५/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Suryakant S/o Sudam Biradar हे दिनांक २५.०४.२०२४ रोजी Chondi Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Aruna W/o. Shrikant Devkatte, Age 32 yrs, Occu. H.H. R/o. Devgao Tq.Mukhed Dist.Nanded
2) Savita W/o. Shamrao Waghmode, Age 30 yrs, Occu. H.H., R/o. Undri Tq.Mukhed Dist.Nanded
3) Godavari W/o Uddhav Kesgire, Age 28 yrs, Occu. H.H., R/o. Kesgirwadi Po. Wadhwana (Bu.) Tq.Udgir Dist.Latur
4) Dnyaneshwari W/o Omkant Devkatte, Age 25 yrs, Occu. H.H,. R/o. Shirgapur Tq.Sangareddi Dist. Medak (Telangana)
5) Suraksha W/o. Mohan Waghmode, Age 22 yrs, Occu. H.H., R/o. Undri Tq.Mukhed Dist.Nanded

यांनी खालील नमूद ५ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Aruna W/o. Shrikant Devkatte | 32 | Daughter |
| 2) | Savita W/o. Shamrao Waghmode | 30 | Daughter |
| 3) | Godavari W/o Uddhav Kesgire | 28 | Daughter |
| 4) | Dnyaneshwari W/o Omkant Devkatte | 25 | Daugther |
| 5) | Suraksha W/o. Mohan Waghmode | 22 | Daughter |

अर्जदार याने Suryakant S/o Sudam Biradar या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Suryakant S/o Sudam Biradar यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः १५/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः २४/०७/२०२४

आदेशावरुन

(संतोष डी. शिंदे) कनिष्ठ लिपिक, सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर — (पी.एस.देशपांडे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ८१ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार शिवाजी काशिनाथ दासरे ज्यापेक्षा चुलते नामे कमलाकर नागनाथ दासरे हे दिनांक २१/०९/२०१६ रोजी मौजे हिसामनगर, ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | शिवाजी काशिनाथ दासरे | ५२ | पुतण्या |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १३/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २२/०७/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ८० /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार सोना भ्र. रामलिंग गायकवाड व इतर ज्यापेक्षा वडील नामे धनाजी गुंडाजी माने हे दिनांक २७/०२/२०२४ रोजी श्री. छत्रपती शिवाजी महाराज सरकारी रुग्णालय, सोलापूर या ठिकाणी अपघाताने मयत झाले असुन ते मौजे कोनाळी ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते. त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | लक्ष्मण धनाजी माने | ३८ | मुलगा |
| २) | बबिता दत्ता रणदिवे | ३५ | मुलगी |
| ३) | सोना रामलिंग गायकवाड | ३१ | मुलगी |
| ४) | काजल देवानंद वाघमारे | २८ | मुलगी |
| ५) | अश्विनी भागवत जाधव | २५ | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १४/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २२/०७/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ७९ /२०२४ निशाणी क्र.

अर्जदार नरसिंग भगवानगिर गिरी व इतर ज्यापेक्षा वडील नामे भगवानगिर रामबाबा गिरी हे दिनांक ०४/०८/२०२२ रोजी मौजे देवणी बु. ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | नरसिंग भगवानगिर गिरी | ४४ | मुलगा |
| २) | भारतबाई भगवानगिर गिरी | ७५ | पत्नी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १३/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २२/०७/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)






# उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो



## उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!

अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव




# स्मृती मानधना ठरली टीम इंडियासाठी तारणहार; शतकी खेळीसह ऐतिहासिक कामगिरी करणारी दुसरी भारतीय फलंदाज



दिल्ली-अमेरिका न्यूयॉर्कमध्ये टी-२० विश्वचषकाचे सामने सुरू असतानाच भारतात महिला क्रिकेट संघ वनडे मालिका खेळत आहे. भारतीय महिला क्रिकेट संघ आणि दक्षिण आफ्रिका महिला संघ यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका भारतात खेळवली जात आहे, ज्यातील पहिला सामना आज १६ जूनला बेंगळुरू येथील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर सुरू आहे. या सामन्यात टीम इंडियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात सलामीवीर आणि भारतीय संघाची उपकर्णधार स्मृती मानधनाने अर्धशतक झळकावत ऐतिहासिक कामगिरी आपल्या नावे केली आहे.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाची सुरुवात खराब झाली, मात्र सलामीवीर फलंदाज आणि उपकर्णधार स्मृती मानधना हिने संघाचा डाव सांभाळत निर्णायक खेळी केली. यादरम्यान स्मृतीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्येही मोठी कामगिरी आपल्या नावे केली. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळल्या जात असलेल्या सामन्यात भारतीय महिला क्रिकेट संघाने सुरुवातीपासूनच विकेट गमावल्या. ९९ धावांवर भारतीय संघाचा निम्मा संघ पॅव्हेलियनमध्ये परतला होता. मात्र, उपकर्णधार स्मृती मानधानीने संघाच्या डावाची धुरा सांभाळत ६१ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. हे तिचे एकदिवसीय कारकिर्दीतील २७वे अर्धशतक ठरले.

स्मृती मानधनाचे संयमी शतक

दुसऱ्या टोकाला सतत पडणाऱ्या विकेट्सदरम्यानही मानधना एका टोकाला पाय घट्ट रोवून उभी होती. तिने शेफाली वर्मा (७) सोबत पहिल्या विकेटसाठी १५, दयालन हेमलता (१२) सोबत दुसऱ्या विकेटसाठी १७, कर्णधार हरमनप्रीत कौर (१०) सोबत तिसऱ्या विकेटसाठी २३ आणि जेमिमा रॉड्रिग्ज (१७) सोबत तिसऱ्या विकेटसाठी २३ धावांची भागीदारी केली. तर चौथ्या विकेटसाठी ३७ आणि ऋचा घोष (३) सोबत पाचव्या विकेटसाठी सात धावांची भागीदारी केली. स्मृती एकटीच दक्षिण आफ्रिकेच्या संघावर भारी पडली आणि फक्त अर्धशतकचं नाही तर १२७ चेंडूत तिने १२ चौकार आणि एका षटकारासह ११७ धावा करत संघाला मोठी धावसंख्या रचण्यात मदत केली.

स्मृती मानधनाने तिच्या या कामगिरीसह आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ७ हजार धावांचा टप्पा पार केला. अशी कामगिरी करणारी स्मृती मानधना ही भारतीय महिला संघाची दुसरी खेळाडू ठरली, याआधी मिताली राजने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये हा पराक्रम केला होता. यासह, स्मृती महिला क्रिकेटमध्ये सलामीवीर म्हणून ५० हून अधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या क्लबमध्ये सामील झाली आहे. न्यूझीलंडच्या सुझी बेट्सने महिलांच्या एकदिवसीय मालिकेत ३२ वेळा ५०पेक्षा जास्त धावा केल्या आहेत. तर शार्लोट एडवर्ड्स (२८ वेळा) दुसऱ्या स्थानावर आणि मानधना (२७ वेळा) तिसऱ्या स्थानावर आहे.

महिला एकदिवसीय मालिकेत सलामीवीर म्हणून ५० हून अधिक धावा करणारे खेळाडू

३२ वेळा- सुझी बेट्स
२८ शार्लोट एडवर्ड्स
२७ वेळा- स्मृती मानधना
२७ वेळा- लॉरा वोल्वार्ड
२५ वेळा- बेलिंडा क्लार्क

# शिस्तीचे धडे कुणाकडून घेतो? रोहित शर्मासोबतच्या वादावर शुभमन गिलचा पलटवार




मुंबई-टीम इंडिया सध्या टी २० वर्ल्ड कप २०२४ साठी अमेरिका आणि वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर आहे. टीम इंडियाने सुपर ८ मध्ये धडक दिली असून आता टीम इंडिया वेस्ट इंडिज येथे पुढील सामने खेळेल. मात्र, न्यूयॉर्क दौऱ्यानंतर भारतीय संघ व्यवस्थापनाने गिलला भारतात परत पाठवण्याचा निर्णय घेतला. यानंतर भारतीय संघ व्यवस्थापन शुभमन गिलवर नाराज असल्याची माहिती समोर येत होती, तसेच रोहित आणि शुभमन यांच्यातही वाद झाल्याच्या चर्चा शनिवारी सोशल मीडियावर रंगल्या होत्या. मात्र शुभमनने यावादावर पडदा टाकून सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे.

शनिवारपासून समोर येत असलेल्या मीडिया रिपोर्ट्सनुसार, टी-२० वर्ल्ड कप दरम्यान संघ व्यवस्थापन गिलवर नाराज झाले असल्याची माहिती मिळतंय होती. टीम इंडियासोबत वेळ घालवण्याऐवजी गिल इतर काम करत होता. गिल आपल्या वैयक्तिक व्यवसायाबाबत न्यूयॉर्कमध्ये अधिक सक्रिय होता. यामुळे संघ व्यवस्थापन त्याच्यावर नाराज झाले आणि त्याला भारतात परत जाण्यास सांगितले.

शुभमन गिल, रिंकू सिंग, आवेश खान आणि खलील अहमद यांचा सुरुवातीला भारतीय टी-२० विश्वचषक संघात राखीव खेळाडू म्हणून समावेश करण्यात आला होता. मात्र, न्यूयॉर्कमधील सामन्यानंतर गिलला आवेश खानसोबत परत येण्यास सांगण्यात आले. आता फक्त खलील अहमद आणि रिंकू सिंग स्टँडबायवर आहेत. गिलला भारतात परत पाठवल्यावर रोहित शर्मा आणि शुभमन गिलमध्ये सुद्धा वाद असल्याची माहिती समोर आली होती. यामुळेच शुभमनने टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माला इंस्टाग्रामवर अनफॉलो केल्याचे सुद्धा बोलले जात होते. मात्र या चर्चा दरम्यान आता शुभमन गिलने रोहित शर्मावर पोस्ट लिहून वादावर पडदा टाकला आहे. टीम इंडिया सध्या सुपर ८ राउंडमध्ये पोहोचली असून ग्रुप बी मध्ये भारतासह, ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्तान यांचा समावेश आहे.

शुभमन गिलने रोहित शर्मा आणि त्याची मुलगी समायरा सोबतचा फोटो इंस्टाग्रामवर शेअर करून लिहिले, ''सॅमी आणि मी शिस्तीचे धडे रोहितकडून घेतो''. या पोस्टवरून शुभमन आणि रोहितमध्ये सर्वकाही आलबेल असल्याचं दिसत आहे.

# हम भी इंसान हैं, गलती हमसे भी, पाकिस्तान विश्व चषकातून बाहेर पडल्यानंतर इमाद वसिमचे मोठे वक्तव्य



दिल्ली-पाकिस्तानी संघाचा अनुभवी अष्टपैलू खेळाडू इमाद वसिमने कबूल केले आहे की पाकिस्तानी संघाने खूप खराब कामगिरी केली. ज्यामुळे संघ टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या ग्रुप स्टेजमधून बाहेर पडला. त्याने चाहत्यांना आणि प्रसारमाध्यमांना हे समजून घेण्याचे आवाहन केले की, आम्ही माणसं आहोत आणि आमच्याकडूनही चुका होऊ शकतात. अमेरिका आणि आयर्लंड यांच्यातील अ गटातील सामना पावसामुळे रद्द झाला, ज्यामुळे पाकिस्तान 'सुपर ८' च्या शर्यतीतून बाहेर पडला.पाकिस्तान बाहेर पडल्यानंतर इमाद वसिम काय म्हणाला?

त्याचबरोबर पहिल्यांदाच या स्पर्धेत खेळणाऱ्या अमेरिकेने या मोठ्या स्पर्धेच्या पुढच्या टप्प्यात प्रवेश करत इतिहास रचला. सुपर ओव्हरमध्ये अमेरिकेने पाकिस्तानचा पराभव केला होता पाकिस्तानी खेळाडू इमाद वसिमने आयर्लंडविरुद्धच्या सामन्यापूर्वी बोलताना सांगितले की, ''होय, आम्ही सर्वात खालचा तळ गाठला आहे. त्यापेक्षा तुम्ही खाली जाऊ शकत नाही, हेच सत्य आहे. कारण प्रामाणिकपणे सांगायचे तर पाकिस्तान संघात बऱ्याच गोष्टी लवकरच सुटणार आहेत. पीसीबीचे अध्यक्ष व मंडळ यावर तोडगा काढतील.''

संपूर्ण संघाने कामगिरी चांगली केली नाही

अमेरिका आणि भारताविरुद्धच्या पराभवाबद्दल बोलताना इमाद वसिम म्हणाला, 'अमेरिकेविरुद्ध हारणे हा खेळाचा एक भाग आहे, पण आपण अमेरिकेविरुद्ध हारायला नको होते. भारताविरुद्धही सामना आमच्या हातात होता आणि आम्ही हारायला नको होते. म्हणून, याबद्दल आम्ही कोणतीही कारणं देऊ शकत नाही. संपूर्ण संघाने कामगिरी चांगली केली नाही आणि यासाठी आम्ही दोषी आहोत.''

आम्ही पण माणसं आहोत -

याशिवाय मीडियाशी बोलताना इमाद वसिमने अनेक मुद्द्यांवर भाष्य केले. पाकिस्तानला आपला खेळ सुधारण्यासाठी काय करावे लागेल हे त्यांनी सांगितले. मात्र, जाता-जाता इमादने एक गोष्ट सांगितली, ज्यामुळे तो चर्चेत आहे. तो म्हणाली की, ''मला एक गोष्ट सांगावीशी वाटते की आम्ही पण माणसं आहोत. आमच्याकडूनही चुका होऊ शकतात आणि याचे आम्हाला पण वाईट वाटते.''

इमाद वसिमला पुढे विचारण्यात आले की, तो पाकिस्तान क्रिकेटमध्ये कोणता बदल पाहू इच्छितो, ज्यावर त्याने उत्तर दिले, 'हे माझे कार्यक्षेत्र नाही, परंतु मला वाटते की एक बदल आणि मोठा बदल व्हायला हवा, जेणेकरून आपण पुढे जाऊ शकू आणि विश्वविजेते होऊ शकू. क्रिकेटशी लढू शकतो. हे सर्व मी म्हणू शकतो.



कॅनडाचे टोरंटोतील बीएमओ फील्ड येथे मेजर लीग सॉकर (एमएलसी) सामन्यादरम्यान स्पर्धा करताना टोरंटो एफसी आणि शिकागो फायर एफसी मधील खेळाडू.

# पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक ग्रंथालय व विश्वस्त बदल अर्ज पध्दती कार्यशाळेचे आज आयोजन

**उदगीर (प्रतिनिधी)** पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक ग्रंथालय व विश्वस्त बदल अर्ज पध्दती कार्यशाळेचे आज कोल्हापुर येथे जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे.

ग्रंथमित्र तानाजीराव मगदुम यांच्या ७३ व्या जन्मदिनानिमित्त कोल्हापुर जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने आज मंगळवार दि. १८ जुन २०२४ रोजी कै. कु. सुशिला मगदुम ग्राम वाचनालय बडगाव ता.कागल जि.कोल्हापुर येथे सकाळी ११ वाजता संपन्न होत आहे.

पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक ग्रंथालय व विश्वस्त बदल अर्ज पध्दती या विषयावरील कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी राज्यग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार हे राहणार असुन प्रमुख अतिथी म्हणून धर्मादाय उपआयुक्त कोल्हापुर श्रीमती के.आर. सुपाते, श्रीमती अपर्णा वाईकर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कोल्हापुर, शरद वाळके सहाय्यक धर्मादाय आयुक्त, डी.एस. पाटील अध्यक्ष चॅरिटी प्रॅक्टिशनर्स बार असोसिएशन कोल्हापुर, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले, पुणे विभाग ग्रंथालय संघाचे कार्यवाह सोपानराव पोवार, सोलापुर जिल्हा ग्रंथालय संघाचे पुंडलिक मोरे, देवानंद पाटील आदि उपस्थित राहणार आहेत. पहिल्या सत्रात पर्यावरण संवर्धन आणि वृक्ष लागवड या विषयावर निसर्गमित्र अनिल चौगले, तर दुसऱ्या सत्रात विश्वस्त बदल अर्ज पध्दती या विषयावर सत्यनारायण शेनोय धर्मादाय आयुक्त कार्यालय कोल्हापुर हे मार्गदर्शन करणार आहेत.

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे. चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३९९/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Bhagubai W/o. Laxman Dopewad हे दिनांक २०.०४.२०१६ रोजी At. Manjari Post. Avalkonda, Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Ushabai W/o. Umakant Dopewad, Age 56
2) Rameshwar S/o. Umakant Dopewad, Age 38,
3) Sukeshana W/o. Gopal Boile, Age 34,
4) Nikita D/o Umakant Dopewad, Age 20
5) Vandana W/o Dnyanoba Boinwad, Age 60

R/o At. Manjri, Post Avalkonda, Tq.Udgir, Dist.Latur

यांनी खालील नमूद हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Ushabai W/o. Umakant Dopewad | 56 | Daughter in law |
| 2) | Rameshwar S/o. Umakant Dopewad | 38 | Grandson |
| 3) | Sukeshana W/o. Gopal Boile | 34 | Granddaughter |
| 4) | Nikita D/o Umakant Dopewad | 20 | Granddaughter |
| 5) | Vandana W/o Dnyanoba Boinwad | 60 | Daughter |

अर्जदार याने Bhagubai W/o. Laxman Dopewad या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Bhagubai W/o. Laxman Dopewad यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः १५/०६/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः २९/०६/२०२४

आदेशावरुन

(डी.ए.कांबळे) कनिष्ठ लिपिक, ३ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(पी.एस.देशपांडे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

# नागपुरात मद्यधुंद तरुणांनी फुटपाथवर झोपलेल्या ९ मजुरांना कारने चिरडले

नागपूर : राज्यभरात अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झाली असून हिट अँड रन च्या अनेक चित्रविचित्र घटना समोर येत आहेत. पुण्यातील पोर्शे कार अपघाताने तर अख्ख्या राज्याचं वातावरण तापलं होतं. हे प्रकरण शांत झालेलं नसतानाच आणखी नवीन प्रकरणं राज्यभरातून उघडकीस येत आहेत. त्यातच नागपुरातही झालेल्या एका हिट अँड रन प्रकरणाने खळबळ उडाली आहे. मद्यधुंद अवस्थेत असलेल्या सात तरुणांच्या एका गाडीने नागपुरात फुटपाथवर झोपलेल्या नऊ मजुरांना चिरडले. यांपैकी दोघांचा मृत्यू झाला असून सातजण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वाठोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दिघोरी नाक्याजवळ काल रात्री १२ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. यात एका भरधाव इरटीका कार चालकाने रस्त्याच्या कडेला झोपलेल्या मजुरांना अक्षरक्षः चिरडत नेले. धक्कादायक बाब म्हणजे यातील आरोपीने घटना स्थळावरून पळून जाण्याच्या नादात कारला मागेपुढे केल्याने अपघाताची तीव्रता अधिक वाढली व यात २ मजुरांचा मृत्यू झाला. तर सात जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतकांमध्ये एका बालकाचा देखील समावेश आहे.

सात मजुरांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी कारचालकाला अटक केली असून सध्या पुढील तपास पोलीस करत आहेत.

कोण होते हे नशेखोर तरुण?

सदर हिट अँड रन प्रकरणात अपघातग्रस्त कारमध्ये भूषण लांजेवार, सौरभ कंडुकर, वंश झाडे, सन्मय पात्रेकर, अथर्व बानाईत, अथर्व मोघरे, आणि ऋषिकेष चौबे हे सात मित्र होते. हे सातही मात्र वंश झाडे याच्या वाढदिवसाच्या पार्टीला नागपूरच्या शेरे पंजाब धाब्यावर पार्टी करायला गेले. दरम्यान, कार ही सौरभ कडुकरच्या मालकीची असून पार्टी केल्यानंतर कार भूषण लांजेवारने चालवायला घेतली. हे सर्व २० ते २२ वयोगटातील तरुण असून वेगवेगळ्या महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत.

सर्व मित्र मद्यधुंद अवस्थेत असतानाही त्यांनी नागपूरचा आऊटर रिंग रोड फिरायचा बेत आखला आणि गाडी दिघोरी रोड मार्गे नेण्याचे ठरवले. काल रात्री १२ वाजताच्या सुमारास अपघातग्रस्त भागात एक विवाह सोहळा सुरु होता. त्यामुळे तेथे थोडी गर्दी आणि वाहनांची रेलचेल होती. त्याच दरम्यान ही घटना घडली. आरोपींना कठोर शिक्षा करण्याचे देवेंद्र फडणवीस यांचे आदेश परिणामी या घटनेची सखोल चौकशी करून आरोपींना कठोर शिक्षा होईल, हे सुनिश्चित करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

# प्रभू रामाने पदस्पर्श केलेल्या उत्तरेश्वर पिंपरी पावन भूमीत माऊली दादांची तपश्चर्या

**अॅड.शाम कुलकर्णी**

औसा / प्रतिनिधी- प्रभू रामाच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या उत्तरेश्र्वर पिंपरी या भूमीमध्ये माऊली महाराज यांनी उत्तरेश्र्वर महादेवाची आणि हनुमंत रायाची तपस्या केली आणि हयात भर नामस्मरण आणि अन्नदान हे तत्त्व आचरणात आणले त्याचीही पुण्याई मला .विप्र कुलोत्पन्न स्वय प्राज्ञ असा आशीर्वाद त्यावेळी मिळाला होता असे प्रतिपादन ह भ प श्री अमृताश्रम स्वामी महाराज जोशी यांनी केले आहे काल रविवार दि. १६जुन रोजी माऊली महाराज यांच्या २४ व्या पुण्यतिथी सोहळ्यात कीर्तन सेवेत ते बोलत होते.

सेवेकरिता आदिनारायण साराचे ते सार केला उपकार ब्रम्हयानी ब्रह्मयाने बोध अत्रीसी पे केला तो शेष लाधला दत्तात्रया. या संत एकनाथ महाराजांच्या अभंगावर अत्यंत भक्ती विद्वत प्रचुर पण रसाळ असे निरूपण केले ब्रह्म वयवर्तक खंडातील उत्तरेश्र्वर पिंपरीच्या उल्लेख आहे जटायु पक्षाचे उत्तर क्रिया प्रभू रामचंद्रांनी याच पावन अशा उत्तरेश्र्वर क्षेत्री केली. आणि अशा रामाच्या पदस्पर्श ठिकाणी म्हणजे पिंपरीमध्ये उत्तरेश्र्वर महादेवाची आणि हनुमंत रायाची थोर तपस्या माऊलींनी केली आहे महाशिवरात्रीचा उत्सव आणि माऊलींच्या दर्शनासाठी त्या काळात हजारो लोक उत्तरेश्र्वर पिंपरी ला येत असत नंतर त्यांच्या गुरुस्थानी म्हणजे चाकरवाडी ला माऊली समाधीस्थ झाले आणि इथेच त्यांची ही संजीवन समाधी असून आज देखील माऊलींना भेटण्यासाठी त्यांच्या पवित्र समाधीचे दर्शन आणि महाप्रसाद घेण्यासाठी हा जनसागर इथे लोटला असल्याचे महाराजांनी म्हटले जीवनामध्ये गुरुकृपा सर्वश्रेष्ठ आहे जी ऊर्जा चैतन्य व जीवन मुक्ती प्रदान करते या भागामध्ये गुरुनाम गुरु बंकट स्वामी महाराजांच्या नंतर माऊली दादांनी या असमंत परिसरात परमार्थ फुलवला वाढवला आणि तो वैभवाप्रति नेला असे उद्गार महाराजांनी काढले.

जीवनात विनम्रता हे सूत्र अंगीकारणारे माऊली यांनी नम्र झाला भूता त्याने कोंडीले अनंता याची सिद्धता भक्तांना दाखवलेली आहे संप्रदायांमध्ये अत्यंत पूजनीय व श्रद्धे असे स्थान माऊलींचे आहे चाकरवाडी म्हणजे एक परमार्थ आत्मसात करण्याची आणि आचरणाची एक पाठशाळा आहे संस्काराचे हे केंद्र असल्याचे महाराज म्हणाले चाकर म्हणजेच सेवा आणि ही चाकरवाडी सेवेचा संदेश देते त्यामुळे प्रत्येकाने माऊलींच्या दरबारात आल्यानंतर दान,नामस्मरण भजन कीर्तन प्रवचन हाती जे पडेल व जी क्षमता असेल ती सेवा करून माऊलींना नतमस्तक व्हावे असे सांगितले.


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

प्रो. योगेश कुमार
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर**
**नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.



यशवंत
मंगळवार दि. १८ जून २०२४
उदगीर
पान ८
कार्यालय :०२३८५-२५३९१८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com

**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग

# क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी मुस्लिम बांधवांना दिल्या बकरी ईदच्या शुभेच्छा



**उदगीर (प्रतिनिधी)** मतदार संघातील उदगीर व जळकोट शहरात ईद – उल अदहा बकरी ईद मोठ्या उत्साहात मुस्लिम बांधवाकडून साजरी केली जाते. मुस्लिम बांधवांना बकरी ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे हे मतदारसंघात आवर्जुन उपस्थित होते. उदगीर येथील ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवाकडून नमाज पठण करण्यात आले. त्यानंतर ना. संजय बनसोडे यांनी सर्व मुस्लिम बांधवांना गुलाब पुष्प देऊन बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी आ.गोविंदराव केंद्रे, बाजार समितीचे माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस समीर शेख, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, विधानसभा अध्यक्ष प्रवीण भोळे, बाजार समितीचे संचालक श्याम डावळे, कार्याध्यक्षवसंतपाटील, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, माजी उपनगराध्यक्ष फ़ैजुखाँ पठाण, नजीर हाशमी, माजी नगरसेवक अनिल मुदाळे, फ़य्याज शेख, नरसिंग शिंदे, व्यंकट बोईनवाड, राजकुमार चव्हाण, नवनाथ गायकवाड, प्रदीप जोंधळे, अजहर मोमीन, जितेंद्र शिंदे, दयानंद शिंदे, मदन पाटील, राजकुमार गंडारे, सतिश कांबळे, संघशक्ती बलांडे, बाबासाहेब सुर्यवंशी, अविनाश गायकवाड, आदी उपस्थित होते.

# अखेर .. दापका राजा रस्त्यावरील पुलाच्या कामास निधी मंजूर

## जळकोट तालुका विकास परिषदेच्या पाठपुराव्याला यश



**जळकोट (माधव होनराव)** दापका राजा ते जळकोट रस्त्यावरील परट ओहळाजवळ पुलाच्या उभारणीला मंजुरी व कार्यारंभ पत्र मिळाल्यामुळे फ़टाके फ़ोडून, पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. ऑगस्ट २०२३ मध्ये ग्रामस्थ, विद्यार्थी, विकास परिषदेच्या वतीने पाण्याबसून पाच तास आंदोलन करण्यात आले होते.

क्रीडामंत्री ना. संजय बनसोडे यांनी शासनाकडे पाठपुरावा करून पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून भरीव निधी मंजूर करून घेतला आहे. लगेचचं चार दिवसात या पुलाच्या कामाला सुरवात करत असल्याचे अभियंता डी. आर. पाटील यांनी सांगितले. गेल्या अनेक वर्षापासून दापका राजा ते जळकोट या रस्त्यावरील परट होळाजवळ पूल नसल्याने पावसाळ्यात पाण्यातून ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून जावे लागत होते. सदरील पुलाचा निधी मंजूर केल्याबद्दल जळकोट विकास परिषदेचे अध्यक्ष संग्राम कदम, सचिव नगरसेवक प्रा. गजेंद्र किडे, रामलिंग वाडकर, संतोष म्हेत्रे, आदिनाथ सिद्धेश्वरे, बालाजी कवठेकर, मनोज बोधले, बालाजी पवार, शिवकुमार गुड्डा, सुधाकर वंजे, संतोष डुमणे, बाळू भ्रमन्ना, शिवकांत डांगे, दिगांबर होनराव , अरुण जोगदंड, रवी गुड्डा, शाहरूख मोमीन, परमेश्वर भ्रमन्ना , स्वप्नील गुड्डा, प्रभाकर धुळशेट्टे, राजकुमार गंगोत्री यांच्यासह शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी यांनी समाधान व्यक्त केले आहे.

**✽तापमान✽**
✽दि.१७/०६/२०२४
कमाल तापमान–३३.० से.
किमान तापमान२४.३.से
✽आर्द्रता – ६८%✽
✽शरिर क्रिया विभाग
पशुवैद्दकिय उदगीर

# माऊली ग्रुपच्या वतीने खा. शिवाजी काळगे यांचा सत्कार



**उदगीर (प्रतिनिधी)** लातूरचे नवनिर्वाचीत खासदार डॉ. शिवाजी काळगे उदगीर दौऱ्यावर आले असता शासकीय विश्राम गृह उदगीर येथे माउली ग्रुपाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी माऊली ग्रुपचे मार्गदर्शक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे, विलास बोके, माउली ग्रुपचे अध्यक्ष चंद्रकांत डोईजोडे, उपाध्यक्ष मनोहर पांचाळ, सचिव मनोज शिवनखेडे, प्रा. सुनिल पाटील, कुमार चौधरी, राम मोतीपवळे, शिवलिंग मठपती, विजयकुमार सजनशेट्टे, शिवशंकर मठपती, ॲड. कपील बिरादार, शिवाजी चिल्ले, शिवशंकर जिवणे, संजय दुणगे, विजय कळसे, संतोष काळेकर, भरत कोयले, मन्मथ मुळे, डॉ. विजय कवठाळे आदि उपस्थित होते.

# शेतकरी संघटनेच्या वतीने देवणी येथे रस्ता रोको आंदोलन.

**देवणी (प्रतिनिधी)** शेतकरी संघटनेच्या वतीने देवणी येथे आनंद जीवने उर्फ़ पृथ्वीराज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचा पीक कर्जाचा व्याज परतावा मिळावा., पिक विमा ३वर्षा पासूनचां मिळावा आठ तास दिवसा लाईटमिळावे व, सीएससी सेंटरवर विमा भरण्यासाठी अनधिकृतपणे दोनशे रुपये आकारले जात आहे, तो थांबावे व खतांचा तुटवडा आहे ते सुरळीतकरूनशेतकऱ्याला खत मिळावे व चढ्या भावाने देऊ नये अन्यथा त्यांच्यावरती कारवाई करावी असे शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न सोडवण्यासाठी शेतकरी संघटनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे .या आंदोलनास शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष सुरेंद्र काशिनाथ अंबुलगे, युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष मिथुन दिवे ,लातूर जिल्हा अध्यक्ष गजानन बोळंगे, जील्हा कार्याध्यक्ष संजय देवप्पा,देवणी तालुकाध्यक्ष विकास नमनगे व योगेश तगरखेडे श्रीमंत अण्णा लुल्ले करीम भाई शेख चेतन मिटकरी शेतकरी संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत तरी शेतकरी संघटनेच्या वतीने विविध पक्षातील कार्यकर्ते व पदाधिकारी यांना नम्र विनंती आहे की शेतकऱ्यांच्या प्रश्न सोडवण्यासाठी या आंदोलनामध्ये उपस्थित राहून सहकार्य करावे व परिसरातील सर्व शेतकरी बांधव या कार्यक्रमास उपस्थित राहावे ही शेतकरी संघटनेच्या वतीने नम्र विनंती.

**घर विकणे आहे**
**शिवाजी महाविद्यालय/ विद्यावर्धिनी हायस्कुलच्या पाठीमागे नई अबादी उदगीर येथील बलराम रामचंद्र येरमे यांचे घर ज्याची साईज ८० ८० दोन मजली घर ज्यात सर्व सोईनी युक्त असलेल्या ३१ रुम विकणे आहे.**
**संपर्क ९८२३६३२३००, ९४२३३४७७५०, ९०९६४२४०४२**

# महाविकास आघाडीचे पं. स. समोर धरणे आंदोलन




**उदगीर (प्रतिनिधी)** तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांनी अहिल्यादेवी सिंचन विहीर योजना आणि शेतकऱ्यांसाठी जनावरांचा गोठा मागणीसाठी ग्राम पंचायतमार्फ़तपंचायत समितीकडे मागणीचे प्रस्ताव सादर केले आहेत. मागच्या एक वर्षापासूनशेतकऱ्यांच्या मंजूर विहिर व गोठ्यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत नसल्याने शुक्रवारी (दि. १४) महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पंचायत समितीच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर यांना देण्यात आलेल्या निवेदनात, उदगीर तालुक्यातील ग्रामीण भागातील अल्पभुधारक शेतकऱ्यांसाठी विहीर व जनावरांचे गोठ्याची योजना आहे. त्या योजनेचा लाभ घेण्यासाठी तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांनी ग्रामपंचायतच्या ठरावासह व लागणाऱ्या पूर्ण कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव पंचायत समिती कार्यालयाकडे सादर करून सहा महिने ते एक वर्षाचा कालावधी झाला आहे. परंतु मागणीचा प्रस्ताव सादर केलेल्या शेतकऱ्यांना विहीर व जनावरांच्या गोठ्यांचा लाभ अद्यापही मिळालेला नाही.

शेतकऱ्यांनी मागणी केलेल्या विहीर व जनावरांच्या गोठ्यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता का देण्यात येत नाही? याबाबत गटविकास अधिकारी यांनी चौकशी करून माहिती द्यावी. सदर योजनांचा लाभ शेतकऱ्यांना देण्यास दिरंगाई व टाळाटाळ करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध कार्यवाही करावी. पंचायत समितीच्या निष्क्रिय कार्यपद्धतीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्यासाठी असलेला योजनांचा लाभ मिळत नाही. त्यामुळे पंचायत समिती कार्यालयासमोर तीव्र धरणे आंदोलन करीत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. यावेळी आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रा. शिवाजी मुळे, शिवसेनेचे (उबाठा) तालुका प्रमुख चंद्रकांत टेंगेटोल, शहराध्यक्ष आजीम दायमी, व्यंकटराव पाटील आवलकोंडेकर, ज्ञानेश्वर पाटील, गजानन सताळकर, दत्तात्र्य काकडे, संतोष बिरादार, धनाजी बनसोडे, प्रेम तोगरे, शकील सय्यद, नामदेव भोसले, अण्णासाहेब बनशेळकीकर, हबीबखान पठाण, प्रशांत गायकवाड, अजय शेटकार, युवराज जोमदे, सागर सोनाळे, अनिल पंचाक्षरी, बसवराज म्हादा, साजिद खुरेशी, अरुण नळगीरकर, दयानंद बिरादार, आकाश कस्तुरे, राहल कांबळे, बालाजी पाटील, बालाजी हळीखेडे, सुधाकर सावंत, अविनाश उगीले, भारत केंद्रे, दत्ता गुरमे, विकास कांबळे, कांबळे, अमृत पाटील, प्रदीप पाटील, तानाजी वडले आदी आंदोलनात सहभागी झाले होते.

गटविकास अधिकाऱ्यांच्य लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन निवेदन स्वीकारले. तर पंचायत समिती कार्यालयात विहीर व जनावरांच्या गोठ्यांसाठी आज पर्यंत प्राप्त झालेल्या प्रस्तावांना पुढील तीन दिवसात मंजुरी देण्यात येईल. येईल. तरी आंदोलन स्थगित करावे अशा विनंतीचे लेखी आश्वासन गटविकास अधिकारी यांनी आंदोलनकर्त्यांना दिले. त्यामुळे आंदोलनकर्त्यांनी त्यांचे आंदोलन मागे घेतले.

# राजमाता जिजाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक ,येथे करण्यात आले.

त्यावेळी चंद्रकांत टेंगटोल, गजानन सताळकर, विजयकुमार चवळे, विवेक सुकणे, मदन पाटील, नेमीचद पाटील, वसंत गोटमुखले, बाबासाहेब सूर्यवंशी, प्रेम तोगर्गे, सुनील पाटील, नंदकुमार पटणे, निवृत्ती जवळे, सतीश पाटील मानकीकर, डी एस बिरादार सर, कनिष्क शिंदे, राहुल बिरादार, पंकज कालनी, नारायण भोसले, सचिन पाटील, विजयकुमार जाधव, चंदन कदम, गुणवंत वाडकर, आनंद घोगरे, अविनाश जाधव, संदीप बिरादार, पी पी पाटील चिखलीकर, जनार्दन शिंदे, राम पाटील. अनिल मुदाले ,अरविंद बिरादार,सतीश पाटील हिप्पलनेकर ,अभिजित पाटील, मनोज पाटील ,अक्षय जाधव,बस्वराज डांगे,उपस्थित होते.